




# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक ११० * नांदेड * रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# युद्ध पुन्हा सुरू होणार?

## इस्त्रायलने युद्धविराम तोडला; भीषण हल्ल्यात अख्खं शहरच उद्धवस्त

**तेहरान (वृत्तसंस्था)–** इस्त्रायलकडून पुन्हा इराणवर हल्ला करण्यात आला आहे. या भीषण हल्ल्यात अख्खं शहर उद्धवस्त झाले आहे. या हल्ल्यानंतर पुन्हा युद्ध सुरू होण्याची शक्यता आहे.

इस्त्रायलकडून २८ फेब्रुवारी रोजी इराणवर पहिला हल्ला करण्यात आला आणि भीषण युद्धाला सुरुवात झाली. इस्त्रायलने इराणवर हल्ला करताच अमेरिकेनं देखील या युद्धात उडी घेतली. हे युद्ध तब्बल ४० दिवस सुरू होतं, अखेर ४० व्या दिवशी तीनही देशांकडून युद्धविरामाची घोषणा करण्यात आली आणि जगाने सुटकेचा निश्वास सोडला. अमेरिका आणि इराणकडून दोन आठवड्यांसाठी युद्धविरामाची घोषणा करण्यात आली होती, मात्र युद्धविरामाचा कालावधी संपताच अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड



ट्रम्प यांनी पुन्हा एकदा युद्धविराम वाढवण्याची घोषणा केली. दरम्यान सध्या अमेरिका आणि इराणमध्ये शंती वार्ता संबंधित बोलणं सुरू आहे. ही या चर्चेची दुसरी फेरी आहे. यादरम्यान इस्त्रायलकडून पुन्हा एकदा युद्धविराम तोडण्यात आला आहे, त्यामुळे जगभरात खळबळ उडाली आहे.

जेव्हा अमेरिका इराण आणि इस्त्रायलमध्ये युद्धविराम झाला होता, तेव्हा इस्त्रायल लेबनॉनवर देखील हल्ला करणार नाही, असं ठरलं होतं. मात्र त्याच्या दुसऱ्याच दिवशी इस्त्रायलकडून लेबनॉनवर हल्ला करण्यात आला, त्यामुळे इराण चांगलंच नाराज झालं होतं. शेवटी सौदी अरेबियाच्या मध्यस्थीने इस्त्रायल आणि लेबनॉनमध्ये देखील युद्धविराम घडून आला होता, डोनाल्ड ट्रम्प यांनी याबाबत घोषणा केली होती.

मात्र त्यानंतर आता इस्त्रायलने पुन्हा एकदा युद्धविराम तोडला आहे. इस्त्रायलकडून दक्षिण लेबनॉनवर पुन्हा एकदा हल्ले करण्यात आले आहेत. समोर आलेल्या माहितीनुसार इस्त्रायलने दक्षिण लेबनॉनमध्ये असलेल्या बिंत जुबैल या शहरावर भीषण हल्ले केले आहेत. इस्त्रायलच्या हल्ल्यांमध्ये हे अख्ख शहरच पूर्णपणे उद्धवस्त झालं आहे. अल जजीराच्या एका रिपोर्टनुसार इस्त्रायलने बिंत जुबैल शहरातील अनेक इमारतींवर मोठे हल्ले केले आहेत. या हल्ल्यांमध्ये लेबनॉनचं प्रचंड नुकसान झालं आहे. इस्त्रायलने अनेक इमारती उडवल्या आहेत. याबाबत लेबनॉनच्या आरोग्य मंत्र्यांकडून देखील माहिती देण्यात आली आहे.

## भाजप प्रवेशानंतर हरभजन सिंग यांच्या विरोधात आपचे आंदोलन

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** माजी क्रिकेटपटू आणि राजकारणी हरभजन सिंग यांच्या यांनी आपच्या इतर सहा खासदारांसह पक्षाचा राजीनामा देऊन भारतीय जनता पक्षात प्रवेश केला आहे. यानंतर दुसऱ्याच दिवशी आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी हरभजन सिंग यांच्या घराबाहेर जोरदार आंदोलन केले. यावेळी आंदोलकांनी त्यांच्या घराच्या भिंतीवर काळ्या रंगाने 'गद्दार' हा शब्द लिहिला. तसेच जालंधरमधील त्यांच्या निवासस्थानाबाहेर अनेक कार्यकर्त्यांनी डोळ्यांवर काळ्या फिती बांधून निषेध व्यक्त केला.

दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्षाला मोठा धक्का बसला आहे. राज्यसभा खासदार राघव चड्ढा यांनी शुक्रवारी १५ वर्षांनंतर पक्ष सोडण्याची घोषणा केली. चड्ढा यांनी इतर खासदारांसह ते भाजपामध्ये प्रवेश केला आहे. राज्यसभेतील 'आप'च्या उपनेतेपदावरून त्यांना हटवल्यानंतर काही आठवड्यांतच हे पाऊल उचलले आहे. ज्यामुळे आम आदमी पक्षात उभी फूट पडली आहे.

## खत टंचाई, लिकींग व काळा बाजार रोखण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची कृषी सेवा केंद्रांवर धडक तपासणी

**नांदेड (प्रतिनिधी)–** खरीप हंगामच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी नवीन मोंढा, नांदेड येथील वसुंधरा फर्टीलायझर्स कृषी निविष्ठा विक्री केंद्रास तसेच गोदामास भेट देवून साठा केलेल्या खताची तपासणी केली. तसेच श्री फर्टीलायझर्स कृषी सेवा केंद्र येथे अचानक भेट देऊन बाजारातील खते व बियाणे पुरवठा व विक्री संदर्भात माहिती घेतली. कृषी निविष्ठा विक्रेते यांचे परवाने, साठा रजिस्टर, ई-पॉस मशीनची तपासणी करून प्रत्यक्षात खताचा किती साठा आहे हे तपासले.

याबाबत कृषी निविष्ठा विक्रेते यांना ई-पॉस मशीन शिवाय खत विक्री करू नये तसेच खताची साठेबाजी करू नये अशा सूचना दिल्या. युरिया व डीएपीच्या विक्री बाबत जिल्ह्यातील सर्व कृषी क्रेंदाची खरीप हंगामपूर्व १०० टक्के तपासणी पूर्ण करण्याबाबत नांदेड तालुक्याचे गुणनियंत्रण कृषी अधिकारी श्रीमती चातरमल यांना सुचना देण्यात आल्या. तसेच दर्शनी भागात फलक लावण्याबाबत सुचना दिल्या. ई-



पॉस वरून खतांचा अहवाल काढून प्रत्यक्ष भौतिक साठ्यासोबत व साठा रजिस्टर सोबत जुळतो किंवा कसे याची पडताळणी केली. खत विक्रीच्या भौतिक बिलांची तपासणी केली व शेतकरी बांधवांनी प्रत्यक्षात ते खरेदी केल्याची खातरजमा केली.

शेतकऱ्यांना दर्जेदार व योग्य दरात कृषी निविष्ठा उपलब्ध होत आहेत का याची प्रत्यक्ष पाहणी केली. जिल्हाधिकाऱ्यांनी खत टंचाई, कृत्रीम साठेबाजी, लिकींग पद्धत व काळा बाजार होणार नाही यासाठी कडक सूचना दिल्या. त्यांनी स्पष्ट निर्देश दिले की, खतांचा साठा लपून किंवा कृत्रीम टंचाई निर्माण करण्याऱ्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. लिकींग पद्धतीने विक्री केल्यास व शेतकऱ्यांची फसवणूक केल्यास तात्काळ परवाने निलंबीत करण्यात येतील असे स्पष्ट निर्देश दिले. जादा दराने खत विक्री केल्यास संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्याचे स्पष्ट संकेत दिले. शेतकऱ्यांना दर्जेदार कृषी निविष्ठा उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आले.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, कृषी विकास अधिकारी अनिल कुमार ऐतवाडे, विभागीय तंत्र अधिकारी बालाजी मुंडे, मोहीम अधिकारी सचिन कपाळे, जिल्हा गुणनियंत्रण निरीक्षक अमोल पेकम, तालुका गुणनियंत्रण निरीक्षक श्रीमती पुनम चातरमल, आरसीएफ जिल्हा प्रतिनिधी कापसे व इफको जिल्हा प्रतिनिधी घाडगे हजर होते.

## भविष्यातही पक्षात आणखी फूट पडण्याची दाट शक्यता

### भाजपमध्ये प्रवेश करताच राघव चड्ढांचं वक्तव्य, 'आप'ची चिंता वाढली

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** भविष्यात पक्षात आणखी फूट पडण्याची दाट शक्यता भाजपमध्ये प्रवेश केलेले राघव चड्ढा यांनी व्यक्त केली आहे.

१४ वर्षांच्या इतिहासात अनेक चढ-उतार, यश आणि अंतर्गत कलह पाहणाऱ्या आम आदमी पार्टीमध्ये शुक्रवारी मोठा राजकीय भूकंप झाला. संसदीय दलात मोठी फूट पडून पक्षाच्या दोन-तृतीयांश खासदारांनी भाजपमध्ये प्रवेश केला. अरविंद केजरीवाल यांच्या पक्षात झालेल्या या आजवरच्या सर्वात मोठ्या फुटीनंतरही संकट टळलेले नाही, तर पक्षासमोर आता नवीन



चिंता निर्माण झाली आहे.

पक्षापुढील मुख्य आव्हान आता दिल्ली या त्यांच्या सर्वात मजबूत आणि जुन्या गडामध्ये २२ आमदारांना एकत्र ठेवण्याचे आहे. विशेषतः राघव चड्ढा यांनीही पक्षात भविष्यात आणखी फूट पडण्याची दाट शक्यता वर्तवली आहे. ज्या प्रकारच्या फुटीचे ते सूत्रधार बनले आहेत, त्याकडे पाहता 'आप' आता त्यांच्या वक्तव्याला हलक्यात घेण्याची जोखीम पत्करू शकत नाही.

आम आदमी पार्टीने शुक्रवारी सकाळी पंजाबमध्ये एक पत्रकार परिषद घेतली होती. त्यावरूनच पक्षात काहीतरी मोठी उलथापालथ होण्याची शक्यता असल्याचे सिद्ध झाले होते. पंजाबमधील पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, 'आप' नेत्यांवरील ईडीचे छापे हे विशिष्ट 'सूचनांनुसार' टाकण्यात आले होते.

## रिक्षा, टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीवरुन राजकारण तापलं

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्रात रिक्षा-टॅक्सी चालकांना मराठी भाषा सक्तीची करण्याचा निर्णय राजकीय मुद्दा बनला आहे. यावरुन राजकीय वादविवाद सुरु झाले आहेत.

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या विषयात आक्रमक भूमिका घेत इशारा दिला आहे. येत्या १ मे पासून या आदेशाची अंमलबजावणी सुरु होणार आहे. रिक्षा आणि टॅक्सी चालकांना ग्राहकांना मराठी भाषेत बोलावं लागेल. मराठी लिहिता, वाचता न येणाऱ्या रिक्षा, टॅक्सी चालकांचे परवाने येत्या १ मे पासून रद्द करण्याचा इशारा सरनाईक यांनी दिला आहे.

## अंतर्गत वादातून एकाचा खून; पोलिसांनी घेतले तिघांना ताब्यात

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहरातील भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जुन्या वैमनस्यातून एकाचा चाकूने भोसकून शुक्रवारी मध्यरात्री खून करण्यात आला. ही घटना नवी वाडी भागात घडली.



भाग्यनगर पोलिसांनी काही दिवसांपूर्वीच आर्म ॲक्ट अंतर्गत ताब्यात घेतलेल्या अट्टल गुन्हेगाराने आपल्या मित्रांना सोबत घेऊन या तरुणाचा पाठलाग करून खून केला. शहरातील परिसरातील नवी वाडी येथे एका तरूणाचा खून करण्यात आला. आरोपी सोनू ऊर्फ अनिकेत सदाशिव बुक्तरे याने आपल्या अन्य साथीदारांसह पूर्व वैमनस्यातून प्रताप दत्ता गायकवाड (वय २६) या तरूणाचा पाठलाग करून चाकूने भोसकून खून केला आहे. सदर घटना शहरातील एका दारू दुकानासमोर शुक्रवारी मध्यरात्री घडली.

दरम्यान या घटनेची माहिती मिळताच अतिरिक्त पोलीस अधिक्षक सुरज गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर) रामेश्वर व्यंजने, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले, भाग्यनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे, महेश माळी आदी अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देत माहिती घेतली. या प्रकरणी सोनू उर्फ अनिकेत सदाशिव बुक्तरे, विजय वायवळ आणि सुरज सोनू बुक्तरे यांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्यावर भाग्यनगर पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

**कारवाईतून सुटताच केला खून**

काही दिवसांपूर्वी सुरज बुक्तरे आणि प्रताप गायकवाड यांच्यात हाणामारी झाली होती. यावेळी सुरज बुक्तरे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. याचाच वचपा म्हणून प्रताप गायकवाडचा खून केल्याची पोलिसांसमोर आरोपीने कबुली दिली. सोनू बुक्तरे याला ४ दिवसांपूर्वीच पोलिसांनी आर्म ॲक्ट अंतर्गत ताब्यात घेतले होते. कारवाईनंतर त्याला सोडताच त्याने पाठलाग करून खून केला आहे.

## उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत आज नांदेडमध्ये

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे उद्योग, मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत हे रविवार २६ एप्रिल रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

रविवार, २६ एप्रिल २०२६ रोजी मुंबई येथून विमानाने सकाळी ११.३० वा. नांदेड विमानतळ येथे आगमन व मोटारीने हदगावकडे प्रयाण. दुपारी १.०१ वा. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित सामुहिक विवाह मेळावा येथे उपस्थिती. स्थळ- पंचशिल माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा हदगाव. दुपारी १.४५ वा. हदगाव येथून मोटारीने नांदेडकडे प्रयाण. दुपारी २.४५ वा. गोदावरी अर्बन मल्टिस्टेट क्रेडिट को.ऑप. सोसायटी लि. नांदेड येथे सदिच्छा भेट. स्थळ- तरोडा नाका पुर्णा रोड नांदेड. दुपारी ३.३० वा. नांदेड विमानतळ येथून विमानाने मुंबईकडे प्रयाण करतील.

## ग्रा.पं. समोर ठेवलेल्या 'त्या' मृतदेहावर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार

### लोहा तालुक्यातील दापशेड येथील घटना

**नांदेड (प्रतिनिधी)–** लोहा तालुक्यातील दापशेड येथे एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्यानंतर सार्वजनिक स्मशानभूमीत जाण्यासाठी रस्ता नसल्याने संतप्त नातेवाईकांनी ग्रामपंचायत कार्यालयासमोर मृतदेह आणून तिथेच सरण रचले होते. परंतु पोलीस आणि महसूल प्रशासनाने मध्यस्थी केल्याने प्रकरण निवळले. त्यानंतर मृत महिलेच्या पार्थिवावर स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.




लोहा तालुक्यातील सोनखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या दापशेड येथे गंगाबाई धोंडीबा रेचेवाड (वय ७५) या महिलेचा वृद्धापकाळाने मृत्यू झाला. सदर गावातील सार्वजनिक स्मशानभूमी ही गावापासून काही अंतरावर दूर असून त्या ठिकाणी जाण्या -येण्यासाठी योग्य मार्ग नसल्यामुळे अंत्यविधीसाठी नातेवाईकांनाही मोठी कसरत करावी लागते. ही बाब लक्षात घेता स्मशानभूमीला चांगला रस्ता करून देण्यात यावा या मागणीसाठी रेचेवाड कुटुंबियांनी आपल्या कुटुंबातील मयत गंगाबाई धोंडीबा रेचेवाड यांचा मृतदेह थेट दापशेड ग्रामपंचायतमध्ये आणून ठेवला. एवढेच नाही तर याच ठिकाणी अंत्यसंस्कार करणार असा निर्धार घेतल्याने प्रशासन घामाघुम झाले. नातेवाईक एवढ्यावरच न थांबता त्यांनी थेट अंत्यसंस्कारासाठी लाकडे जमा केले आणि सरण रचले, परंतु लोहा तहसीलदार आणि सोनखेड पोलिसांनी मध्यस्थी करत नातेवाईकांची समज काढली आणि तब्बल सहा तासांनंतर मयत महिलेच्या पार्थिवावर दापशेड स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकारामुळे गावात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## १८ ते २५ मेदरम्यान अंदमानात मान्सून धडकण्याची शक्यता

**मुंबई (प्रतिनिधी)–** या एप्रिल महिन्यात सूर्यनारायणाचे रौद्ररूप उभ्या भारताने पाहिले आहे. तापमान ४०-४४ डिग्रीपर्यंत पोहचले आहेत. उत्तर, मध्य आणि पूर्वोत्तर भारत उष्णतेच्या लाटेत होरपळला आहे. तर अल निनोमुळे यंदा मान्सून लांबण्याचा आणि पाऊस उशीरा येण्याचा दावा करण्यात येत होता. परिणामी शेतकऱ्यांसह सरकारही चिंतेत आले होते. पण नवीन संकेतानुसार मान्सूनने सांगावा धाडला आहे. पाऊस नेहमीपेक्षा लवकर धडकेल. युरोपीयन मध्यम श्रेणी हवामान अंदाज केंद्राने नवीन अंदाज वर्तवला आहे. त्यानुसार, मान्सून अगोदर अंदमान निकोबार बेटावर धडकेल. येत्या १८ ते २५ मे या कालावधीत पावसाचे आगमन होईल. दरवर्षी भारतात मान्सून याच ठिकाणाहून भारतात प्रवेश करतो.

मे च्या मध्यात अथवा अखेरीस अंदमान निकोबार बेटासह दक्षिण भारतात पाऊस हजेरी लावेल. या पट्ट्यात ३० ते ६० मिमीहून अधिक पाऊस पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. २५ मे ते १ जून यादरम्यान केरळ आणि तामिळनाडूच्या दक्षिण टप्प्यात पावसाचे आगमन होईल. यामुळे शेतीच्या कामांना वेग येण्याची शक्यता आहे. तर गर्मी, उष्णतेने हवालदिल झालेल्या नागरिकांसह पशूपक्ष्यांना आणि प्राण्यांना मोठा दिलासा मिळेल.

हवामान तज्ज्ञानुसार, सध्याचे सर्व हवामानाचे संकेत हे बंगालच्या खाडीत आणि अंदमानच्या समुद्रावरून दक्षिण-पश्चिम दिशेने वेगवान वारे दर्शवत आहेत. हेच वारे समुद्रावरून आर्द्रता घेऊन येते. या थंडगार वाऱ्यामुळे पावसाची शक्यता बळावते. याशिवाय अंदमानच्या उत्तर पट्ट्यात एक चक्रीवादळ तयार होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मान्सून अवघ्या २० दिवसात भारताच्या दक्षिण किनाऱ्यावर धडकण्याची शक्यता आहे.




## राज्यातील ६ जिल्ह्यांना उष्णतेचा, तर १० जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट

**मुंबई (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राचं हवामान बिघडलय आणि याचा फटका सर्वांनाच बसतो आहे. हवामान विभागाने राज्यातील ६ जिल्ह्यांना उष्णतेचा येलो अलर्ट आणि १० जिल्ह्यांना पावसाचा येलो अलर्ट दिला आहे.

मराठवाड्यातील परभणी, नांदेड आणि लातूर जिल्ह्यांतील पावसाचा येलो अलर्ट पुन्हा जारी करण्यात आला आहे. या जिल्ह्यांत विजांसह पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे

यासह मुंबई, ठाणे आणि रायगड या जिल्ह्यांना हवामान विभागाने उष्णतेचा येलो अलर्ट दिला आहे. तसेच कोकण, सिंधुदुर्ग, रत्नागिरीत दुहेरी वातावरण कायम राहणार असून काही जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

विदर्भात अवकाळी पावसाचे संकट टळले असून अकोला, अमरावती आणि वर्धा या भागांमध्येही उष्णतेचा प्रभाव पुन्हा वाढणार आहे. कमाल तापमान ३८ ते ४१ अंश सेल्सिअसपर्यंत जाणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने दिला आहे. पश्चिम महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचे संकट कायम आहे. पुणे, कोल्हापूर, सांगली, सातारा, आणि सोलापूर या जिल्ह्यांना वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. या जिल्ह्यांना अवकाळी पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे.

## पंजाब किंग्स्‌ने आयपीएलचा इतिहास-भूगोल बदलला! मोडले सर्व रेकॉर्ड्‌स

### २६५ धावांचा यशस्वी पाठलाग करत दिल्लीला हरवलं

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)–** पंजाब किंग्स्‌ने आयपीएलच्या इतिहासात अभूतपूर्व पराक्रम करत सर्वात मोठा रन चेस पूर्ण केला. अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात पंजाबने दिल्ली कॅपिटल्सचा ६ विकेट्सने पराभव करत इतिहास रचला. दिल्लीने प्रथम फलंदाजी करत २६४ धावांचा डोंगर उभारला, जो त्यांच्या आयपीएलमधील सर्वात मोठा स्कोअर ठरला. मात्र, पंजाबने अविश्वसनीय खेळी करत हा २६५ धावांचा लक्ष्य १९व्या षटकातच गाठत विक्रम मोडला.

पंजाबने स्वतःचाच विक्रम मोडत इतिहास घडवला. याआधी २०२४ मध्ये त्यांनी केकेआरविरुद्ध २६२ धावा चेस केल्या होत्या. आता २६५ धावांचा डोंगरही त्यांनी पार केला.

प्रथम फलंदाजी करताना दिल्लीची सुरुवात खराब झाली, अर्शदीप सिंगने पथुम निस्संकाला बाद केले, जो सात चेंडूंमध्ये दोन चौकारांसह ११ धावांवर बाद झाला. त्यानंतर राहुल आणि नितीशने दिल्लीचा डाव सावरला आणि पंजाबच्या गोलंदाजांवर दबाव टाकला. राहुलने ४७ चेंडूंमध्ये आपले शतक पूर्ण केले, पण नितीश शतक पूर्ण करण्यापूर्वीच बाद झाला.

दिल्लीकडून केएल राहुलने ६७ चेंडूंमध्ये १६ चौकार आणि नऊ षटकारांसह नाबाद १५२ धावा केल्या, तर नितीश ४४ चेंडूंमध्ये ११ चौकार आणि चार षटकारांसह ९१ धावा करून तंबूत परतला. डेव्हिड मिलर ३ धावांवर नाबाद राहिला. पंजाबकडून अर्शदीप सिंग आणि झेवियर बार्टलेट यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. केएल राहुल आणि नितीश राणा यांच्यातील दुसऱ्या विकेटसाठीच्या २२० धावांच्या भागीदारीच्या जोरावर दिल्ली कॅपिटल्सने पंजाब किंग्स्‌समोर २६५ धावांचे लक्ष्य ठेवले.



पंजाबच्या विजयाची पायाभरणी प्रभसिमरन सिंग आणि प्रियांश आर्याने केली. दोघांनी पहिल्या ६ षटकांत ११६ धावा ठोकत आयपीएल इतिहासातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पॉवरप्ले स्कोअर नोंदवला. प्रभसिमरन सिंगने २६ चेंडूत ७६ धावा केल्या आणि प्रियांश आर्याने १७ चेंडूत ४३ धावा ठोकल्या.

# गोलुची मावशी



सकाळचे आठ वाजले. गोलू बाळ झोपेतच बिछाण्यात लोळत होता. आईने दार उघडताच मनीमाऊ पटकन घरात आल्या. शेपटी हलवीत म्यॉवं म्यावं या आवाजाने तिनं घर डोक्यावर घेतलं. आई शेवटी म्हणालीच!! -फिरस्तीबाई, आली का घरात? जणू काही हिचंच हे घर आहे. गप्प तरी बसते का? किंजऱ्या आवाजाने लेकराची झोप मोड करते. चल हट इथून.!! झालं, मनीला आईच्या रांगड्या बोलीची सवय झाली होती. दुधाची मक्तेदारीण आईच तर असते. तिच्या भोवती पिंगा घातलं तरप्यायला दूधही मिळायचं नाही. मनी हे सारं समजून होती. खऱ्या अर्थाने आईच तिची पखरण होती. अगदी हलक्या पावलानं ती गोलू बाळाच्या बिछान्याजवळ गेली. बाळाची मम्मी, तिची ताई गाढ साखर झोपेत होती. कॉटखाली जाऊन तिने भले आळोखे पिळोखे घेतले आपलं अंग ताणून घेतलं. मिटल्या डोळ्यानीं तिला तिचा अवघा भूतकाळ आठवला. याच घरात तिच्या आईनं तिला आणि तिच्या तीन भावंडांना तोंडात धरून या घरात आणलं होतं.

घरातील व्हरांड्यातील मोकळ्या जागेतील मोठया कपाटाच्या मागे ही पिलावळ राहू लागली. मनीची आई मग बिनधास्तपणे घराबाहेर फेरफटका मारायची. जणू काही ती नोकरी केल्यागत ड्युटीला जायची. तिची पिलावळ सांभाळायला या घरातील लहानथोर माणसं होती. काही दिवसांनी ही पिलावळ घरभर फिरू लागली. तशी ताई त्यांच्या मागे पुढे करू लागली. ताईचा सगळ्या पिलावर फार जीव! तिच्या अंगा खांद्यावर, ही पिलं बागडायची. मनीच्या आईचा ताईवर फार विश्वास होता. मनीची दोन भावंडं गबरी आणि आंड दांड होती. ती घरभर उनाडक्या करायची. आणि कुठेही घाण करायची. मग ताईची आई त्यानां लाटण्याने रट्टे देई.

एकदा तर त्या दोघांना आईनं हाकलूनच दिलं होतं. घाबरून मनीने कॉट खाली आसरा घेतला होता. ताई च्या हे लक्षात आल्या नंतर ताईने आईशी जंग भांडण केलं. त्या दिवशी ताई जेवलीच नाही. आईनं काकूळतीला येऊन आपला पराभव मान्य केला. आणि काय आश्यर्य!!माझी आई माझ्या भावंडांना घेवून घरात हजर झाली. आईच्या आगमनाने माझ्या ताईला कोण आनंद झाला. आम्हां सगळ्यांना तिने मनसोक्त दूध पाजले.

ताईची आई मग वस्सकण ताई वर ओरडली, तायडे! फार झाले तुझे हे सोंग! ही मांजरीण आणि तिची ही घाणेरडी पिलं मला नाकी नऊ आणतायत. मला तर अक्षरशः तुम्ही सारीजण घरातील नोकरीणच करून टाकलात. तुझे हे भलते थेर मी काही खपवून घेणार नाही. तुझं लग्न महिन्याभरात आहे. येणरे पाहूणे काय म्हणतील?. आईचा भला पहाडी आवाज चढलेला पाहून ताईचे बाबा म्हणाले, अगं ही मांजर माणसाळलेली आहे. तूच माया लावतेस नंतर त्रागा करतेस. राहू दे तिला. आईची गरमागरम पोळी आणि वाटीभर दूध. ताई आम्हां पिलांना द्यायची. हळूहळू आम्हाला ताईची मराठी भाषा कळू लागली. शब्द सारे कळायचे. पण उच्चार म्याउं, म्याउं च असायचा.

ताई आमच्या जीवाभावाची मैत्रीणच होती. तिच्या बिछान्यातच मऊ शार दुलईत आम्ही भावंड शेपट्या हलवीत झोपायचो. दिवस असे मजेत जात होते. माझी आई तर जणू काही या घराची मालकीणच! मस्त ती बिनधास्त पणे आम्हां पिलना घरात ठेवून घराबाहेर पडायची.. पण हे फार काळ टिकलं नाही.एक दिवस आई घरी आलीच नाही. रात्र गेली. तरी आईची चाहूल लागली नाही दुसऱ्या दिवशी बाबांना कुणी तरी सांगितले म्हणे, की तुमची पाळीव मांजरीला शिकारी कुत्र्यांनी मारलं. ताई ला हे कळाल्यावर तिने आम्हां तिन्ही पिलांना घेवून ओक्सबोक्सी रडली. तिनं घरंच डोक्यावर घेतलं.

आम्ही भावंडं म्याऊं, म्याउं करीत केविलवाणे झालो. आमचं हे पोरकेपण जास्त काळ टिकलं नाही. ताईची आईच आमची आई झाली. तिनं जीवापाड आमची काळजी घेतली. मी तशी बारीक आणि किरकोळ होते. पण माझी दोन भावंडे धष्ठपुष्ठ होती. ती घराबाहेर जाऊ लागली. आणि एक दिवस ती घराबाहेर गेलेली पुन्हा आलीच नाहीत. ताईने खूप शोध घेतला. पण ती सापडलीच नाहीत. ती खुपच छान होती. कुणी तरी त्यानां पकडून घेवून गेलं असावं. हे आईच्या बोलण्यातून मला कळालं. या प्रसंगांनतर ताई आणि ताई चे आईबाबा मला विसंबेनात. माझी ते खूपच देखभाल करू लागले. मला सर्व माणसाच्या सवयी जडल्या. स्वच्छ, नीटनेटकेपणा हे माझे गुण सर्वांना आवडू लागले ताईच्या लग्नात तर माझा करवालीचाच थाट होता.

नवी नवरी झालेल्या माझ्या ताईने, ही माझी छोटी बहिण बरं का?- अशी भाऊजींना ओळख करून दिली होती. आता तर ताईला बाळ झालंय हे गोंडस बाळ म्हणजे आमचा लाडका गोलू! मी त्याची मावशी. गोलुची मावशी ! मनी हळूच डोळे उघडले कानोसा घेतला शेपटी उडवीत ती किचन मध्ये आली. आईचा पदर तोंडाने पकडून ती आईजवळ घुटमळली. तशी आई म्हणाली, मने, जरा गप गं ! आपलं गोलू बाळ उठला कां? बघ जरा. आई ची आज्ञा ऐकत मनी गोलूच्या बिछान्याकडे धावली. बाळ अजून झोपेत होता. तिने बाबांना उठवले. जणू काही तिला म्हणायचे होते. बाबा उठा, डेअरी तून दूध आणायला जा. तिने पिशवी तोंडात धरून बाबांना दिली. तसं बाबांनी तिला गोंजारले, आणि आईला म्हणालें, अगं! मला मनीने दुधासाठी पिशवी दिलीय. तिला घेवून मी दूध डेअरीला जातोय. आईने हसून उत्तर दिले. ही सांगकामी मनी आपली सगळीच कामं करते. आधारच आहे ती आपला.

बाबांनी स्कुटी सुरु केली तशी मनी अंगणात धावली बाबांच्या पा्याजवळ ती स्कुटी त बसली. डेअरीचे दूध आणल्या नंतर ती आईच्या पा्याजवळ घुटमळू लागली म्हणजे आई समजायची मणीला दूध हवंय. वाटीभर दूध पिलं की, मनीचा मोहरा बाळाकडे वळायचा. म्याउं, म्याऊं ऊठ रे बाळा! या आवाजाने गोलू बाळ उठायचाच! अगदी लहान, तान्हा असल्यापासून मनी बाळाला खेळवायची. आता तर गोलू बाळ दुडूदुडू चालतोय. तिची शेपटी ओढतोय. तिला हे सारं मनापासून आवडते. गोलूची मावशी असल्यामुळे त्याचे लाड, कोडकौतुक करावेच लागणार!

तिची ताई, ताईचे आई, बाबा हे सारं तिचंच तर अवघे कुटुंब! गोलूची मावशी आहे ना मी! हेच माझं खरं नाव!

**-ललिता शिंदे/बोकारे**
नांदेड
मो.९८६०४६३३५२

---

# उष्णतेची लाट : पिकांवर संकट

आजच्या काळात हवामानातील अनिश्चितता ही केवळ पर्यावरणीय समस्या राहिलेली नाही, तर ती थेट देशाच्या अन्नसुरक्षेला आणि अर्थकारणाला आव्हान देणारी गंभीर बाब ठरत आहे. उत्तर आणि मध्य भारतात उसळलेल्या तीव्र उष्णतेच्या लाटेने या संकटाची तीव्रता अधोरेखित केली आहे. ही उष्णतेची लाट केवळ ऋतुमानातील बदल नसून, शेतीप्रधान भारतासाठी धोक्याची घंटा आहे. गहू आणि तांदूळ यांसारख्या प्रमुख अन्नधान्यांच्या उत्पादनावर याचा गंभीर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. गहू उत्पादनाच्या दृष्टीने पाहिले, तर त्याच्या वाढीच्या महत्त्वाच्या टप्प्यावर म्हणजे दाणे भरण्याच्या काळात उष्णतेचा ताण पडल्यास उत्पादनावर मोठा परिणाम होतो.

यंदा लवकर आलेल्या उष्णतेमुळे पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेश यांसारख्या प्रमुख उत्पादक राज्यांमध्ये गव्हाचे उत्पादन घटण्याची चिन्हे दिसत आहेत. काही दिवसांच्या तीव्र तापमानामुळेही गव्हाचे दाणे कोमेजतात, ज्यामुळे उत्पादनाची गुणवत्ता आणि प्रमाण दोन्ही घटते.



अलीकडेच उष्णतेमुळे गव्हाच्या तुटवड्याचा सामना केलेल्या भारतासाठी ही परिस्थिती पुन्हा उद्भवणे अत्यंत चिंताजनक आहे.

तांदूळ हे खरीप पीक असले, तरी तेही या हवामान बदलाच्या संकटापासून अलिप्त नाही. उष्णतेमुळे बियाण्यांची उगवण कमी होते, रोपांची वाढ मंदावते आणि पाण्याची गरज वाढते. आधीच पाण्याच्या तुटवड्याचा सामना करणाऱ्या देशात ही परिस्थिती अधिक गंभीर ठरू शकते. जास्त तापमानामुळे बाष्पीभवन वाढते, परिणामी शेतकऱ्यांना अधिक प्रमाणात भूजलाचा वापर करावा लागतो. यामुळे पाण्याचा प्रश्न अधिक बिकट होतो. विशेषतः मध्य भारतात, जिथे सिंचन व्यवस्था पुरेशी सक्षम नाही, तिथे पेरणी कमी होणे आणि उत्पादन घटणे ही शक्यता अधिक आहे. या सर्व घडामोडींचा परिणाम केवळ शेतकऱ्यांपुरता मर्यादित राहत नाही. गहू आणि तांदळाचे उत्पादन घटल्यास देशांतर्गत पुरवठा कमी होतो, ज्यामुळे अन्नधान्यांच्या किमती वाढतात आणि महागाईला खतपाणी मिळते. सरकारच्या अन्नधान्य खरेदी धोरणांवरही याचा परिणाम होतो. सार्वजनिक वितरण प्रणाली मोठ्या प्रमाणावर गहू आणि तांदळावर अवलंबून आहे. त्यामुळे उत्पादनात झालेली कोणतीही घट थेट कोट्यवधी लोकांच्या अन्नसुरक्षेला धक्का देऊ शकते. याशिवाय, निर्यात धोरणांवरही मर्यादा येतात, कारण सरकारला आंतरराष्ट्रीय बांधिलकीपेक्षा देशांतर्गत गरजांना प्राधान्य द्यावे लागते.

परंतु या संकटाचा सर्वात गंभीर पैलू म्हणजे आपल्या प्रणालीतील अपुरी तयारी. अनेक वर्षांपासून हवामान बदलाबाबत इशारे दिले जात असतानाही, हवामानास अनुकूल शेती पद्धतींचा विकास अपेक्षित गतीने झालेला नाही. उष्णतेला तोंड देणाऱ्या पीक जातींचा विकास, पाण्याच्या कार्यक्षम वापरासाठी आधुनिक सिंचन तंत्रज्ञान आणि अचूक हवामान अंदाज यंत्रणा या सर्व बाबींमध्ये अजूनही मोठी तफावत आहे. पीक विमा योजना ह्या फक्त नावापुरतेच राहिले आहेत. त्या वेळेवर मदत देण्यात अपयशी ठरल्या आहेत. ही परिस्थिती केवळ तात्पुरत्या उपायांनी हाताळता येणार नाही. यासाठी शेती धोरणात मूलभूत बदल करण्याची गरज आहे. पाण्यावर जास्त अवलंबून असलेल्या पिकांपासून दूर जात, ज्वारी, बाजरी आणि कडधान्यांसारख्या कमी पाण्यात येणाऱ्या पिकांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. स्थानिक पातळीवर पाणी व्यवस्थापन सुधारण्यासाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे.

हवामानातील अस्थिरता ही आता भविष्य काळातील धोका नसून, ती वर्तमानातील कठोर वास्तव आहे. या वास्तवाला सामोरे जाण्यासाठी सरकार, शेतकरी आणि समाज यांनी एकत्रितपणे पुढाकार घेतला पाहिजे. अन्यथा, उष्णतेच्या या वाढत्या लाटा केवळ शेतीचे नुकसान करणार नाहीत, तर देशाच्या अन्नसुरक्षेलाही मोठा धोका निर्माण करतील.

**-सुरेश जाधव**
नांदेड
मो. ९४२३१४०७४१

---

# बौद्धिक संपदा : नवसर्जनाचे संरक्षक छत्र



दरवर्षी २६ एप्रिल हा दिवस संपूर्ण जगात 'जागतिक बौद्धिक संपदा दिन' म्हणून साजरा केला जातो आणि हा दिवस मानवी सर्जनशीलतेच्या सामर्थ्याचा, ज्ञाननिर्मितीच्या प्रक्रियेचा आणि नवोन्मेषाच्या प्रवाहाचा उत्सव म्हणून ओळखला जातो. मानवी सभ्यतेच्या उत्क्रांतीचा मागोवा घेतला असता असे स्पष्टपणे दिसून येते की, मानवाने आपल्या बुद्धीच्या, कल्पनाशक्तीच्या आणि सर्जनशीलतेच्या बळावरच समाज, संस्कृती, विज्ञान आणि तंत्रज्ञानाची उभारणी केली आहे. या सर्व प्रक्रियेतून निर्माण होणारी बौद्धिक संपदा ही केवळ एखाद्या व्यक्तीची वैयक्तिक मालमत्ता नसून ती समाजाच्या प्रगतीची पायाभूत शक्ती आहे. त्यामुळे या संपदेचे संरक्षण, संवर्धन आणि योग्य व्यवस्थापन करणे ही आधुनिक काळातील अत्यंत महत्त्वाची गरज ठरते.

'बौद्धिक संपदा' ही संकल्पना मूलतः मानवी बुद्धिमत्तेने साकारलेल्या निर्मितींशी संबंधित आहे. साहित्य, संगीत, चित्रकला, शिल्पकला, वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक शोध, औद्योगिक डिझाईन्स, व्यापारचिन्हे, भौगोलिक संकेत अशा विविध स्वरूपांमध्ये बौद्धिक संपदेचे अस्तित्व आढळते. या सर्व निर्मितींमध्ये सर्जनशीलता, मौलिकता आणि नवोन्मेष यांचे दर्शन घडते. या निर्मितींचे कायदेशीर संरक्षण करण्यासाठी विविध प्रकारचे बौद्धिक संपदा हक्क अस्तित्वात आले आहेत. कॉपीराइट, पेटंट, ट्रेडमार्क, औद्योगिक डिझाईन, भौगोलिक संकेत हे त्यातील प्रमुख प्रकार होत. या हक्कांमुळे सर्जकाला त्याच्या निर्मितीवर विशिष्ट कालावधीसाठी मालकी हक्क प्राप्त होतो आणि त्यातून आर्थिक व सामाजिक लाभ मिळवण्याची संधी उपलब्ध होते.

जागतिक बौद्धिक संपदा दिन साजरा करण्यामागील उद्दिष्ट केवळ या संकल्पनेची माहिती देणे एवढ्यावर मर्यादित नाही, तर सर्जनशीलतेचा सन्मान करणे, नवोन्मेषाला प्रोत्साहन देणे आणि निर्मात्यांच्या हक्कांविषयी समाजात जागरूकता निर्माण करणे हेही त्यामागील महत्त्वाचे हेतू आहेत. या दिवसाच्या निमित्ताने विविध देशांमध्ये शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे, उद्योगसंस्था आणि शासन यांच्याद्वारे विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांना, संशोधकांना आणि सामान्य नागरिकांना बौद्धिक संपदेचे महत्त्व समजावून सांगितले जाते. विशेषतः तरुण पिढीमध्ये नवकल्पनांची प्रेरणा निर्माण करणे आणि त्यांना त्यांच्या कल्पनांचे संरक्षण करण्याबाबत मार्गदर्शन करणे ही या उपक्रमांची मुख्य उद्दिष्टे असतात.

आजच्या जागतिकीकरणाच्या आणि तंत्रज्ञानाच्या झपाट्याने बदलणाऱ्या युगात बौद्धिक संपदेचे महत्त्व अधिकच अधोरेखित होते. माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, औषधनिर्मिती, कृत्रिम बुद्धिमत्ता, नॅनोतंत्रज्ञान अशा क्षेत्रांमध्ये सतत नवीन संशोधन होत आहे. या संशोधनातून निर्माण होणाऱ्या नवकल्पना आणि शोध यांचे संरक्षण करण्यासाठी बौद्धिक संपदा हक्कांची आवश्यकता अनिवार्य ठरते. एखाद्या संशोधकाने अथवा संस्थेने मोठ्या परिश्रमाने आणि गुंतवणुकीने तयार केलेल्या शोधाचे संरक्षण नसेल, तर त्या शोधाचा गैरवापर होण्याची शक्यता निर्माण होते आणि त्यामुळे संशोधनाची प्रेरणा कमी होऊ शकते. म्हणूनच बौद्धिक संपदा हक्क हे नवोन्मेषासाठी प्रोत्साहन देणारे महत्त्वाचे साधन मानले जाते.

आर्थिक दृष्टीकोनातून पाहता, बौद्धिक संपदा ही आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. ज्ञानाधारित उद्योगांमध्ये बौद्धिक संपदेचे मूल्य प्रचंड असते. सॉफ्टवेअर उद्योग, मनोरंजन क्षेत्र, औषधनिर्मिती उद्योग, फॅशन उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये बौद्धिक संपदेचा मोठ्या प्रमाणावर वापर होतो. या क्षेत्रांमध्ये निर्माण होणाऱ्या उत्पादनांचे आणि सेवांचे मूल्य त्यांच्या सर्जनशीलतेवर आणि नवोन्मेषावर अवलंबून असते. त्यामुळे या क्षेत्रांतील कंपन्या त्यांच्या बौद्धिक संपदेचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करतात. यामुळे आर्थिक विकासाला गती मिळते आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळते.

सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही बौद्धिक संपदेचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. प्रत्येक समाजाची एक वेगळी सांस्कृतिक ओळख असते आणि ही ओळख त्या समाजाच्या परंपरा, कला, साहित्य, लोकसंस्कृती यांमध्ये प्रतिबिंबित होते. या सांस्कृतिक वारशाचे संरक्षण करणे हे देखील बौद्धिक संपदा व्यवस्थेचे एक महत्त्वाचे कार्य आहे. विशेषतः भौगोलिक संकेतांच्या माध्यमातून एखाद्या विशिष्ट प्रदेशातील उत्पादनांची ओळख जपली जाते. उदाहरणार्थ, एखाद्या प्रदेशातील हस्तकला, खाद्यपदार्थ किंवा कृषी उत्पादने यांना त्यांच्या विशिष्ट वैशिष्ट्यांमुळे विशेष दर्जा प्राप्त होतो आणि त्याचे संरक्षण केले जाते. यामुळे त्या प्रदेशातील कारागीर, शेतकरी आणि उत्पादक यांना आर्थिक लाभ मिळतो आणि त्यांच्या पारंपरिक ज्ञानाचे जतन होते.

तथापि, बौद्धिक संपदा हक्कांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. विशेषतः डिजिटल युगात माहितीचे आदानप्रदान अत्यंत सुलभ झाले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून साहित्य, संगीत, चित्रपट, सॉफ्टवेअर यांची सहज देवाणघेवाण होत असल्यामुळे कॉपीराइट उल्लंघनाच्या घटना मोठ्या प्रमाणावर वाढल्या आहेत. पायरेटसी, नकली उत्पादने, ट्रेडमार्कचे उल्लंघन या समस्या आज जागतिक स्तरावर गंभीर बनल्या आहेत. या समस्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायदे, प्रभावी अंमलबजावणी आणि जनजागृती आवश्यक आहे.

डिजिटल युगात बौद्धिक संपदेच्या स्वरूपात मोठे बदल होत आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, बिग डेटा यांसारख्या तंत्रज्ञानामुळे नवीन प्रकारच्या सर्जनशीलतेचा उदय होत आहे. या नव्या परिस्थितीत बौद्धिक संपदा हक्कांच्या व्याख्या आणि अंमलबजावणी यामध्ये बदल करण्याची गरज निर्माण झाली आहे. उदाहरणार्थ, कृत्रिम बुद्धिमत्तेने निर्माण केलेल्या कलाकृतींचे हक्क कोणाला द्यायचे, हा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. या संदर्भात जागतिक स्तरावर चर्चा सुरू आहे.

भारत सरकारने बौद्धिक संपदेच्या क्षेत्रात विविध धोरणे आणि योजना राबविल्या आहेत. स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी, संशोधनाला चालना देण्यासाठी आणि नवोन्मेषाला समर्थन देण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. 'स्टार्टअप इंडिया', 'मेक इन इंडिया' यांसारख्या उपक्रमांमुळे तरुण उद्योजकांना संधी उपलब्ध होत आहे. यामुळे देशात नवकल्पनांचे वातावरण निर्माण होत आहे आणि आर्थिक विकासाला चालना मिळत आहे.

जागतिक बौद्धिक संपदा दिन हा सर्जनशीलतेचा, नवोन्मेषाचा आणि ज्ञानाचा उत्सव आहे. या दिवसाच्या निमित्ताने आपण आपल्या समाजात बौद्धिक संपदेचा आदर करण्याची संस्कृती विकसित केली पाहिजे. सर्जकांना प्रोत्साहन देणे, त्यांच्या हक्कांचे संरक्षण करणे आणि नवकल्पनांना चालना देणे ही आपल्या सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यामुळेच समाजाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळेल आणि ज्ञानाधारित अर्थव्यवस्था अधिक मजबूत होईल.

अखेर, बौद्धिक संपदा ही मानवाच्या प्रगतीचा मूलाधार आहे. तिचे संरक्षण आणि संवर्धन केल्याशिवाय शाश्वत विकास साध्य होऊ शकत नाही. त्यामुळे जागतिक बौद्धिक संपदा दिनाच्या निमित्ताने आपण सर्वांनी सर्जनशीलतेचा सन्मान करण्याचा, नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्याचा आणि बौद्धिक संपदेच्या संरक्षणासाठी सक्रिय भूमिका घेण्याचा संकल्प केला पाहिजे. हीच या दिवसाची खरी उपयुक्तता आणि महत्ता आहे.

**-डॉ. राजेंद्र बगाटे**
हिंगोली
मो.९९६०

---

## करू नको अहंकार...

जगी नाम होण्यासाठी
आधी तपावे लागते ।
अरे चंदनासमान
नित्य झिजावे लागते ।।
आयत्याला कुठे इथे
गोड लागते भाकरी ।
त्यांना भोगावे लागते
फक्त दुःख नानापरी ।।
हिनवून दुबळ्यांना
तुझी लायकी दावतो ।
अरे कशाला माणसा
पशु समान जगतो? ।।
तुज मरण येईल
तेंव्हा मातीच होशील ।
देह मातीचा पुतळा
किती काळ टिकशील? ।।
प्रेमरूपी मद्यप्याला
जरा तुझ्या ओठी लाव ।
मदतीला गरिबांच्या
मनोभावे नित्य धाव ।।
जग सद्भावे माणसा
करू नको अहंकार ।
जन्म देणाऱ्यांचे कधी
भुलू नको उपकार ।।

**-अजय रमेश चव्हाण,**
तरनोळी ता.दारव्हा, जि.यवतमाळ
मो.८८०५८३६२०७

## मी शांतता आहे

हात सोडू नकोस उगीच माझा,
मी शांतता आहे, माझी गरज
नसल्याचा आव आणू नकोस,
इतिहासाची पाने चाळून पहा,
समजेल तुला माझे महत्व.
अनेकांनी अनेक लढाया, मला
शस्त्र बनवून जिंकल्या,
अनेक शत्रुंनी हिंसा सोडली
माझ्यामुळे, शांतता आहे मी,
माझा स्वीकार कर, आधुनिक
माणूस म्हणून उगाच मिरवू
नकोस, चार चौघात,
हात सोडू नकोस उगीच माझा.
मी गांधी, मी बुद्ध
मीच यशू आहे, हे
ध्यानात धर, बाहेरच्या अर्थहीन
कोलाहलात,नकोस
अडकवू स्वतःला, तुझ्या
हृदयात माझे पालन कर,
मी शांतता आहे....तुला
अमूर्त विजयाकडे नेणारी,
हात सोडू नकोस उगीच माझा.

**-अमित शिंदे**
नांदेड
मो. ९७६७८५१०४६.

---

# भारतीय गणित परंपरेचा अग्रदूत : श्रीनिवास रामानुजन

रामानुजन हे लहानपणापासूनच गणिती कूट प्रश्नांची उकल करण्यात पारंगत होते. खरे तर गणित त्यांच्या रक्तातच भिनलेले होते असे म्हणणे वावगे ठरणार नाही. साहजिकच त्याची प्रचिती त्यांनी शुद्ध गणितात केलेल्या मूलभूत संशोधनामुळे पुढे आली. रामानुजन यांचे बालपण दारिद्र्याशी झगडण्यात व उमेदवारीचा काळ नोकरीसाठी वणवण करण्यात गेला. तथापि, नोकरीसाठी केलेल्या पायपीटीमुळे पुढे जीवनाला अमुलाग्र कलाटणी देणाऱ्या काही मातब्बर व्यक्तींशी त्यांचा योगायोगाने परिचय झाला. त्यांच्या सुदैवाने या मंडळींना गणिताची उत्तम जाण होती.

तथापि, रामानुजन यांनी मांडलेली प्रमेये आणि सूत्रे या मंडळींच्या डोक्यावरून जाऊ लागल्याने रामानुजन हे कुशाग्र बुद्धिमत्तेचे सर्जनशील संशोधक असून त्यांची बुद्धी मार्गदर्शका अभावी मद्रास च्या हवेत खुरटून न जाता तिला धुमारे फुटून अव्वल दर्जाच्या गणितज्ञा मध्ये त्यांचे परिवर्तन होण्यासाठी ते गणिताच्या तीर्थक्षेत्री म्हणजे केंब्रिजच्या ख्यातनाम गणितज्ञांच्या संपर्कात आले पाहिजेत, या निष्कर्षाप्रत ही मंडळी येऊन ठेपली. याच सुमारास अविभाज्य संख्या संबंधीची आपली काही प्रमेए घेऊन



रामानुजन प्रा. शेषू अय्यर यांच्याकडे गेले असता त्यांनी प्रा. हार्डी यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला एक शोधनिबंध दाखविला. या निबंधात निर्देश केलेला पण प्रा. हार्डींनाही अजून जो निष्कर्ष मिळाला नव्हता तो आपण यापूर्वीच काढल्याचे रामानुजनने सांगितले.

प्रा. शेषू यांनी रामानुजननी प्रा. हार्डींना पत्र पाठवून आपल्या निष्कर्ष सोबत इतर काही प्रमेये आणि सूत्रे देखील पाठवावी असे सुचवले. तथापि गणितात तेज बुद्धी असलेल्या रामानुजन यांचे इंग्रजी यथातथाच असल्याने त्यांना महाविद्यालयीन शिक्षणावर पाणी सोडावे लागले होते. त्यांनी पोर्ट ट्रस्ट मधील आपले वरिष्ठ नारायण अय्यर यांच्या मदतीने प्रा. हार्डींना पाठवायच्या पहिल्या पत्राचा मसुदा तयार करून घेतला आणि ते पत्र १९१३ च्या मकर संक्रातीला रवाना केले. हे पत्र जेव्हा प्रा. हार्डींना मिळाले तेव्हा त्यात मळक्या कागदावर इंग्रजीत लिहिलेल्या ओळी मागून ओळी असलेले पत्र व त्यासोबत गणिती चिन्हांनी नटलेली सूत्रे व निष्कर्ष एवढा ऐवज मिळाला. तो पाहून दिवसारंभीच प्रा. हार्डींचा काम करण्याचा उत्साह मावळला. तथापि संध्याकाळी त्यांनी आपले एक सहकारी प्रा. लिटलवुड यांना बोलावून दोघांनी मध्यरात्रीपर्यंत रामानुजन यांच्या पत्राची विशेषता त्यातल्या गणिती निष्कर्षाची चिरफाड केली, तेव्हा हे काम कोणा येरागबाळ्याचे नसून याम ागे अलौकिक सामर्थ्याचा प्रतिभासंपन्न गणिती दडलेला असावा असा त्यांनी निष्कर्ष काढला.

मकर संक्रांतीच्या सुमुहूर्तावर रामानुजन यांनी पाठवलेल्या या पत्राला प्रा. हार्डी आणि लिटलवुड यांनी त्या मध्यरात्री ज्या क्षणी अनुकूलता दर्शक माना डोलावल्या तो क्षण म्हणजे रामानुजन यांच्या जीवनाला क्रांतिकारक वळण लावणारी मंगल घटिकाच म्हटली पाहिजे. प्रा. हार्डी आणि रामानुजन यांच्यात १९१३ ते १९२० पर्यंत जो पत्रव्यवहार झाला त्यातील रामानुजन यांची चार तर प्रा. हार्डी यांची दोन पत्रे वाचायला मिळतात.

रामानुजन यांनी पत्रासोबत पाठवलेल्या प्रमेय व सूत्रांवरून त्यांचा संशोधकीय वकूब जाणून त्यांना जर केंब्रिजच्या गणितज्ञांचे मार्गदर्शन मिळाले तर ते जगप्रसिद्ध गणिती होऊ शकतील या विश्वासाने केंब्रिज विद्यापीठातील प्रा. हार्डी यांनी त्यांना इंग्लंडला बोलावले. त्यांचे रूढी ग्रस्त कुटुंबीय त्यांना जाऊ देण्यास तयार होईनात. त्यांच्या मते समुद्रप्रवास करणे निषिध्द होते. अखेर त्यांच्या आईच्या स्वप्नात येऊन नामगिरी देवीने कौल दिल्यामुळे हा पेच सुटला आणि रामानुजन यांचा विलायतेस जाण्याचा मार्ग मोकळा झाला. त्याच-सुमारास (१९१४) ई. एच. नेव्हिल हे केंब्रिज विद्यापीठातील प्राध्यापक मद्रास विद्यापीठात व्याख्यान देण्यासाठी आले होते.

प्रा. हार्डी यांनी रामानुजन यांना इंग्लंड ला घेऊन येण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली आणि १३ मे १९१४ रोजी रामानुजन केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजात दाखल झाले. तेथे ते १९१९ च्या फेब्रुवारी महिन्यापर्यंत सुमारे पाच वर्षे राहिले. या काळात त्यांचा संशोधनाचा वेग वाढला. सुमारे वीस शोधनिबंध प्रसिद्ध झाले. इतकेच नाही तर त्यांच्या संशोधकीय कामावर केंब्रिज विद्यापीठाने त्यांना बी. ए. ची पदवी प्रदान केली आणि रॉयल सोसायटीने १९१८ साली त्यांना एफ.आर.एस. या दुर्मिळ पदवीने सन्मानित केले.

तथापि इंग्लंडचे थंड हवामान तसेच आपल्या हाताने शाकाहारी जेवण बनवने आणि तेही वेळच्यावेळी खाण्याची आबाळ करणे याचा विपरीत परिणाम होऊन त्यांना क्षय रोगाची बाधा झाली. वर्ष-दीड वर्ष त्यात गेले. प्रकृतीमध्ये काहीशी सुधारणा झाल्यावर त्यांना अल्पकाळ हिंदुस्थानात पाठवल्यास तेथील हवा, नातलग, मित्रांचा सहवास आणि मुख्य म्हणजे घरचे अन्न यामुळे ते आणखी सुधारतील या हेतूने प्रा. हार्डी यांनी १९१९ च्या फेब्रुवारी महिन्यात त्यांना मायदेशी पाठवले. तथापि, भारतातही खूप उपचारानंतर ही त्यांच्या प्रकृतीत काही सुधारणा झाली नाही आणि २६ एप्रिल १९२० रोजी त्यांचे निधन झाले. त्यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने आपण गणितातील मूलभूत तसेच उपयोजित संशोधन यासाठी त्यांचा आदर्श सतत डोळ्यासमोर ठेऊन भारताची गणितातील गौरवशाली परंपरा वाढवूया !

**प्रा. विजय कोष्टी,**
कवठेमहांकाळ जि. सांगली

# विज्ञान आणि आरोग्य यांच्या समन्वयामुळे समाज सुदृढ बनू शकतो –डॉ. नितीन जोशी

**नांदेड (प्रतिनिधी)–** आजच्या बदलत्या जीवन–शैलीमुळे व मोबाईलच्या अतिवापरामुळे समाजस्वास्थ्य बिघडत चालले आहे. व्यापारी, धोरणकर्ते इत्यादींच्या मतलबी व्यवहारामुळे समाजाचे आरोग्य उत्तरोत्तर धोक्यात येत आहे. सामाजिक, धार्मिक तथा समुदायवादी धोरणी उपक्रमात सामान्य माणूस गुंतून पडला जात आहे. करणी, भानामती इत्यादी बाधित व्यक्तींचे आयुष्य बुवा–बापूंच्या पायऱ्या झिजवण्यात खर्ची होत आहे. परिणामी सर्वसामान्य माणसांचे आजार अधिक गंभीर होत आहेत. या पार्श्वभूमीवर विज्ञान आणि आरोग्य यांचे समन्वय असणे अतिशय महत्त्वाचे आहे, असे मत नांदेड येथील सुप्रसिद्ध पोटविकार तज्ज्ञ डॉ. नितीन जोशी यांनी व्यक्त केले.

यावर्षीच्या जागतिक आरोग्य दिन २०२६ निमित्त आरोग्यासाठी



एकत्र: विज्ञानासोबत उभे राहा (together for health - stand with science) या जागतिक आरोग्य संघटनेच्या संकल्पनेवर आधारित स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरू डॉ. मनोहर चासकर हे होते. तसेच प्र–कुलगुरू डॉ. अशोक महाजन, प्र. संचालक, डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांची उपस्थिती होती. दीड तास चाललेल्या या व्याख्यानात आरोग्य आणि विज्ञान यावर सखोल चर्चा झाली. बदलत्या जीवनशैलीमुळे आरोग्याची कळत नकळत कशी हानी होते, आजाराचे वेळेवर निदान नाही झाले तर गंभीर प्रसंगांना कसे सामोरे जावे लागते. याविषयी डॉ. नितीन जोशी यांनी पीपीटीद्वारे श्रोत्यांना समजावून सांगत होते. त्यांच्या निवेदनात सेवाभाव, विश्वास आणि तळमळ जाणवत होती.

विद्यापीठ तथा शैक्षणिक संस्थांमध्ये अशा आरोग्यविषयक कार्यक्रमांचे आयोजन होणे ही काळाची गरज आहे. प्रत्येकाने आपल्या आरोग्याची उत्तम काळजी घेतली तर समाज आणि देशाचा विकास होण्यास वेळ लागणार नाही. परंपरेला विज्ञानाची जोड देऊन उन्नतीचे स्वप्न बाळगल्यास ते सहज साकार होत असतात, असे मत कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी अध्यक्षीय मनोगत मांडताना व्यक्त केला. तर डॉ. अशोक महाजन यांनी डॉ. नितीन जोशी यांच्या सेवाभाववृत्तीबद्दल कौतुक केले. आरोग्य, विज्ञान आणि बदलत्या जीवनशैलीमुळे अत्यंत साध्या आणि सोप्या भाषेत माहिती सांगितल्याबद्दल डॉ. महाजन यांनी विद्यापीठाच्या वतीने डॉ. जोशी यांचे मनस्वी आभार मानले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पूज्य स्वामीजींच्या प्रतिमेला चंदनहार घालून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आयोजक डॉ. वैजनाथ अनमुलवाड यांनी केले तर भाषा संकुलातील विद्यार्थिनी विधी मुंदडा हिने सूत्रसंचालन व पाहुण्यांचा परिचय करून दिला. शास्त्रज्ञ डॉ. राजाराम माने, डॉ. राजपालसिंह चिखलीकर, इंजि. तानाजी हुस्सेकर, इंजि. अरुण धाकडे, प्रकाश निहलानी, डॉ. मारुती गायकवाड, शिवाजी चांदणे यांच्यासह विद्यापीठातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी हे मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनहित याचिकेचा प्रभाव : बाल हक्क संरक्षण आयोग अधिक सक्षम, पदसंख्येत मोठी वाढ

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्यातील ६ ते १४ वर्षे वयोगटातील बालकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण तसेच त्यांच्या हक्कांचे प्रभावी संरक्षण मिळावे यासाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिकेचा थेट परिणाम म्हणून महाराष्ट्र शासनाने बालहक्क संरक्षण आयोगाच्या रचनेत व कार्यपद्धतीत महत्त्वपूर्ण बदल केले आहेत.

ही जनहित याचिका सेवानिवृत्त न्यायाधीश तानाजी नलावडे आणि माजी शिक्षण संचालक महावीर माने यांनी विद्यार्थ्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी मे. मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचमध्ये दाखल केली आहे. न्यायालयीन सुनावणीदरम्यान शासनाने घेतलेल्या भूमिकेनुसार आयोगात आवश्यक बदल करण्यात आले आहेत.

बाल हक्क संरक्षण आयोग कायदा, २००५ अंतर्गत सन २००७ मध्ये स्थापन झालेल्या आयोगाची पूर्वीची मंजूर कर्मचारी संख्या केवळ १२ होती. मात्र, जनहित याचिकेतील मागण्यांचा विचार करून शासनाने दि. १० एप्रिल २०२६ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे आयोगाची कर्मचारी रचना व्यापकपणे बदलली असून, एकूण २६ पदांना (२० नियमित + ६ बाह्य स्त्रोत) मंजुरी देण्यात आली आहे. या निर्णयामुळे आयोगाच्या कार्यक्षमतेत मोठी वाढ होणार आहे.

यामध्ये जिल्हास्तरावरही आयोगाचे विस्तारीकरण करण्यात आले असून, गट–अ मधील शिक्षण अधिकारी व गट–ब मधील उपशिक्षण अधिकारी अशी महत्त्वाची पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत. यामुळे जिल्हा स्तरावरही शिक्षणाशी संबंधित तक्रारींचे निवारण अधिक प्रभावीपणे होण्यास मदत होणार आहे. यामुळे बालकांच्या शैक्षणिक हक्कांचे संरक्षण अधिक बळकट होणार आहे.

तसेच आयोगाचे काम केवळ मुंबईपुरते मर्यादित न राहता राज्यभर पोहोचावे या उद्देशाने आयोगाने पुणे, मुंबई (कोकण), नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर या सहा प्रादेशिक मुख्यालयांमध्ये सुनावण्या घेण्याची व्यवस्था सुरू केली आहे. पुढील काळात जिल्हास्तरावरही सुनावण्या घेण्याचा विचार सुरू असून, त्यामुळे तक्रारदारांना स्थानिक पातळीवर न्याय मिळण्यास मोठी सोय होणार आहे.

दरम्यान, जनहित याचिकेच्या पार्श्वभूमीवर महिला व बाल विकास विभागाने दि. ६ एप्रिल रोजी अधिसूचना जारी करून आयोगाच्या रिक्त पदांवर नियुक्त्या केल्या आहेत. त्यानुसार संजय विष्णू पुराणिक यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, सदस्य म्हणून गीतांजली बाळाजी बुटी, शुभांगी संजय तांबट, संजय लखे पाटील, अतुल देसाई, प्रवीण भुजाडे आणि मिलन देवेंद्र जंगम (मिलन वसंत गुरव) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्वांची नियुक्ती त्यांनी पदभार स्वीकारलेल्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीसाठी करण्यात आली आहे.

नवीन नियुक्त पदाधिकाऱ्यांनी १५ एप्रिल रोजी पदभार स्वीकारला असून, आयोगाचे कामकाज आता अधिक गतिमान होणार आहे. दरम्यान, न्यायालयाने शासनास उत्तर दाखल करण्यासाठी आठ दिवसांची मुदत दिली असून पुढील सुनावणी २८ एप्रिल रोजी निश्चित करण्यात आली आहे.

एकूणच सेवानिवृत्त न्यायाधीश तानाजी नलावडे आणि माजी शिक्षण संचालक महावीर माने यांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेमुळेच हे सर्व सकारात्मक बदल घडून आले असून, राज्यातील बाल हक्क संरक्षण यंत्रणा अधिक सक्षम व परिणामकारक बनण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.

# माता वासवी जन्मोत्सवानिमित्त आज शहरात शोभायात्रा

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील आर्य वैश्य परिवार मंडळ, कौठ्याच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी आर्य वैश्य कुलस्वामीनी माता वासवी कन्यका परमेश्वरी जन्मोत्सवानिमित्त रविवार, दि. २६ एप्रिल रोजी शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष लक्ष्मीकांत मुक्कावार, सचिव रितेश अमिलकंठवार, कोषाध्यक्ष सचिन काशेटवार व शोभायात्रा प्रमुख संतोष पांपटवार यांनी दिली.

श्री बालाजी मंदिर, विकासनगर, कौठा येथून सायंकाळी ४ वाजता शोभायात्रा निघणार असून, हॉटेल आकृती, महात्मा बसवेश्वर पुतळा, लातूर फाटा व शेवटी वासवी माता मंदिर सिडको रोड येथे समारोप होणार आहे. यावेळी उद्घाटन पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या हस्ते होणार असून, श्री काशी अन्नपूर्णा सत्रम, महासचिव विलास बच्चू, महाराष्ट्र आर्य वैश्य महासभा अध्यक्ष नंदकुमार गादेवार, पोलीस निरीक्षक वाहतूक जगन्नाथ पवार, महासभा उपाध्यक्ष दिलीप कंदकुर्ते यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. तर माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण, विलास बच्चू, नंदकुमार गादेवार, गोविंदराव बिडवई, अनिल मनाठकर, खा. डॉ. अजित गोपछडे, एकनाथराव मामडे, ज्ञानेश्वर महाजन यांच्या हस्ते महाआरती होणार आहे.

# डॉ. कलाम पब्लिक स्कूलचा शिक्षणोत्सव २०२६ संपन्न

## मुलांना स्क्रिनकडून स्किलकडे वळवा : शिवाजीराजे पाटील यांची पालकांना भावनिक साद

**नांदेड (प्रतिनिधी)–** शालेय स्तरावरील विविध स्पर्धा परीक्षांमधील गुणवंतांचा सत्कार, विद्यार्थ्यांच्या अंगभूत कलागुणांचे सादरीकरण आणि करिअर मार्गदर्शन अशा तिहेरी योगाचा डॉ. कलाम पब्लिक स्कूल व संकल्प कोचिंग क्लासेस यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिक्षणोत्सव २०२६ हा सोहळा विष्णूपुरी येथील श्री काळेश्वर मंदिर ट्रस्टच्या सभागृहात हर्षोल्हासात संपन्न झाला.

आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांच्या अध्यक्षतेखाली बहिर्जी स्मारक विद्यालयाचे शारीरिक शिक्षण विभागाचे शिक्षक डी. एम. पाईकराव यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व मिसाईलमॅन डॉ. एपीजे अब्दुल कलाम



यांचे प्रतिमापूजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. बालाजी मोरे तर प्रास्ताविक प्रा. डॉ. संदीप हंबर्डे यांनी केले.

यावेळी प्रमुख वक्ते इंजि. शिवाजीराजे पाटील म्हणाले की, लो एम इज क्राईम. ध्येय मोठे ठेवा आणि आपल्या क्षमतेचा शंभर टक्के सकारात्मक वापर करा. शालेय जीवनात किमान दहावीपर्यंत तरी आपल्या मुलांना मोबाईल व कुसंगतीपासून आवर्जून जपा. मुलांमध्ये स्क्रीनऐवजी स्किलची आवड निर्माण करण्यासाठी पालकांनी प्रसंगी कठोर होण्याचे आवाहन त्यांनी केले.

डॉ. कलाम पब्लिक स्कूल व संकल्प कोचिंग क्लासेसच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे कौतुक करुन इंजि. शिवाजीराजे पाटील पुढे म्हणाले की, सिलॅबस संपविण्यासाठी नसतो तर समजविण्यासाठी असतो, हा विचार करणारी समर्पित शिक्षकांची फळी खऱ्या अर्थाने अवघ्या राष्ट्राची संपत्ती ठरत असते. डॉक्टर चुकला तर एखाद्याचा जीव जाईल, इंजिनिअर चुकला तर एखादी इमारत जमीनदोस्त होईल, पण शिक्षक चुकला तर एक संपूर्ण पिढी गारद होऊ शकते. व्यक्तीच्या जडणघडणीत शिक्षकांचे अमूल्य योगदान असते याची जाणीव असणारे शिक्षक लाभणे हे हल्ली सर्वात मोठे भाग्य म्हणावे लागेल.

अध्यक्षीय समारोपात दिपक कदम यांनी विद्यार्थ्यांना युपिएससी परिक्षेसंदर्भात मार्गदर्शन करुन आंबेडकरवादी मिशन सर्व जातीधर्मातील हुशार, होतकरू व गरजू विद्यार्थ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली.

# किनवटमध्ये पालिका कर्मचाऱ्याला झालेल्या मारहाणीच्या निषेधार्थ कर्मचाऱ्यांचे कामबंद आंदोलन

**किनवट (प्रतिनिधी)–** येथील पालिकेच्या पाणीपुरवठा विभागातील दिव्यांग सफाई कामगार नरसिंग गंगाराम यांना नगरसेवक अभय नगराळे यांनी दि. १८ रोजी शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी मारहाण केली. या घटनेच्या निषेधार्थ किनवट पालिकेतील कर्मचाऱ्यांनी शुक्रवार दि.२४ पासून कामबंद आंदोलन सुरू केले आहे.

महाराष्ट्र राज्य नगर परिषद कर्मचारी संघटनेच्या किनवट शाखेच्यावतीने मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात संबंधित नगरसेवकाविरोधात तत्काळ गुन्हा नोंदवण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणीही कायदेशीर कारवाई करून त्यांना अपात्र ठरवण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविण्याची मागणी करण्यात आली आहे. संबंधित नगरसेवकांकडून पदाचा गैरवापर करून कर्मचाऱ्यांना वारंवार धमकावले जात असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, सुरक्षित व सन्मानपूर्वक काम करण्यासाठी आवश्यक वातावरण नसल्याचा आरोप संघटनेने केला आहे. दरम्यान, संबंधितांवर कठोर कारवाई होईपर्यंत कामबंद आंदोलन सुरूच ठेवण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# एन.एम.एम.एस.च्या परीक्षेत अस्मिता देशमुख जिल्ह्यात प्रथम

**अर्धापूर (प्रतिनिधी)–** एनएमएमएस परीक्षेत अर्धापूर येथील विद्यार्थिनी कु. अस्मिता श्यामसुंदर



देशमुख हिने ११९ मार्क घेत नांदेड जिल्ह्यात सर्वप्रथम येण्याचा मान मिळविला आहे.

मागील वर्षापासून सतत विद्यार्थ्यांकडून अभ्यास करून घेत येथील शिक्षक आकाश कामारीकर यांनी विद्यार्थ्यांना योग्य असे मार्गदर्शन करीत आहेत.

अर्धापूरसारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थिनी कु. अस्मिता देशमुख जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक घेऊन उत्तीर्ण झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक भास्कर लोखंडे व शिक्षकवृंदांनी या यशाबद्दल कौतुक केले आहे.

# लेंडी प्रकल्पग्रस्तांच्या निवाऱ्यासाठी स्वाधार गृहनिर्माण प्रकल्पाच्या वतीने भूमिपूजन सोहळा संपन्न





**देगलूर (प्रतिनिधी)–** लेंडी प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या रावणगाव व हसनाळ परिसरातील रहिवाशांना शासनाने यापूर्वीच खानापूर एमआयडीसी लगत भूखंडाचे वाटप करून पुनर्वसित हसनाळ, रावणगाव उभारले आहे. त्या अनुषंगाने गृहनिर्माण प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले.

संस्कृती संवर्धन मंडळ सगरोळी संस्थेने महाराष्ट्र सोशल हाऊसिंग अँड ॲक्शन लिग्यू (मशाल) केअरिंग फ्रेंड्स मुंबई, आणि १०० हँड्स यांच्या संयुक्त सहकार्याने स्वाधार गृहनिर्माण प्रकल्प राबवून प्रकल्पग्रस्तांना भुज गुजरातच्या धरतीवरील इको फ्रेंडली थंडावा देणारी सिमेंट काँक्रीटचा कमीत कमी वापर करून कमी खर्चात घरकुल बांधून देणार आहेत. या अनुषंगाने गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी गृहनिर्माण प्रकल्पाचा भूमिपूजन सोहळा पुनर्वसित खानापूर जवळील हसनाळ, रावणगाव येथे श्रीमती रुक्मीणबाई पांचाळ व माणिक गुमलवाड यांचे हस्ते पार पडला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील हे होते. तहसीलदार भरत सूर्यवंशी, पुणे येथील निलेश करकरे, प्रमोद देशमुख (सगरोळी), भुज गुजरात येथील प्रकल्पाचे प्रतिनिधी तेजस कोटक, अविनाशराव देशपांडे हसनाळकर, अभिजीत महाजन, वसंत रावणगावकर सर्जेराव ढवळे आणि हसनाळ, रावणगाव येथील प्रकल्पग्रस्त रहिवाशांची उपस्थिती होती.

# शीतल हंबर्डे यांना 'पीएच. डी.' प्रदान

**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा



विद्यापीठाच्या भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलातील विद्यार्थिनी शीतल देविदासराव हंबर्डे यांना इंग्रजी विषयात नुकतीच आचार्य (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली आहे.

शुक्रवार, २४ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या मौखिकी परीक्षेत त्यांना यशस्वी घोषित करण्यात आले. विशेष म्हणजे, विष्णुपुरी नगरीतून ही सर्वोच्च पदवी संपादन करणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत. त्यांचे अनेकांनी अभिनंदन केले.

# देगलूरच्या न्यायालयात पार पडले कायदेविषयक शिबीर

**देगलूर (प्रतिनिधी) –** येथील दिवाणी न्यायालयात २० एप्रिल रोजी तालुका विधी सेवा समिती देगलूरच्या वतीने कायदेविषयक शिबीर नुकतेच पार पडले.

यावेळी न्या. शरद जी. देशपांडे सचिव जिल्हा विधी सेवा प्राधिकरण नांदेड व मा. न्या.राघवेंद्र न. देव न्यायाधीश कनिष्ठ स्तर देगलूर व अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती देगलूर यांचे प्रमुख उपस्थितीत कार्यक्रम पार पडला. न्या. शरद जी. देशपांडे यांनी सुखी जीवन जगण्याकरिताची उदाहरणे सांगून लोकन्यायालयाचे फायदे विशद केले.






ॲड. अनिल पंजोल व ॲड. योगेश मंत्री यांनी अनुक्रमे न्यायालयाविषयी व महिलांचे हक्क आणि अधिकाराबद्दल माहिती दिली. लोकन्यायालयाच्या माध्यमातून जास्तीचे प्रकरणे सामंजस्याने मिटवून घ्यावीत, असे आवाहन न्या. राघवेंद्र न. देव यांनी केले. कार्यक्रम प्रसंगी सहायक सरकारी सहायक अभियोक्ता स्मिता लेंडवे, विधीज्ञ समिती डावखरे, ॲड. योगेश इंगोले, ॲड. वाघमारे, वरिष्ठ लिपीक एच. डी. बैलकमवाड, पोलीस कर्मचारी व पक्षकार उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड. एम. एम. इनामदार यांनी केले.

# नांदेड विभागाने पूर्णा डिपोवर वॅगन तपासण्या वाढवून मालवाहतूक कार्यक्षमता सुधारली

**नांदेड (प्रतिनिधी)–** दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागाने वित्तीय वर्ष २०२५–२६ दरम्यान पूर्णा डिपोवर वॅगन तपासण्यांची संख्या वाढवून आपल्या मालवाहतूक कार्यक्षमता मजबूत करण्यात महत्त्वपूर्ण प्रगती साधली आहे.

सुधारित ऑपरेशनल कार्यक्षमता आणि चांगल्या देखभाल पद्धतींचे प्रदर्शन करत, पूर्णा डिपोवरील वॅगन तपासण्यांची एकूण संख्या २०२४–२५ मध्ये २४८ होती, जी २०२५–२६ मध्ये २८२ वर पोहोचली आहे. या यशाचे एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे प्रीमियम वॅगन तपासण्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली असून, गेल्या वर्षी ५५ प्रीमियम तपासण्या होत्या, तर या वर्षी त्या १५८ वर वाढल्या आहेत.

प्रीमियम तपासण्या म्हणजे जलद आणि अधिक सखोल





तपासणी प्रक्रिया, ज्यामुळे वॅगन कमी वेळात सेवेस तयार होतात आणि उच्च सुरक्षा व गुणवत्ता मानक कायम राहतात. या सुधारामुळे मालगाड्यांचे जलद उपलब्ध होणे शक्य झाले आहे, ज्यामुळे टर्नअराउंड वेळ कमी होतो आणि एकूण मालवाहतूक कार्यक्षमता सुधारते.

जलद वॅगन तयार असल्यामुळे परिसरातील उद्योग आणि मालवाहतूक ग्राहक आता आपले माल अधिक कार्यक्षमतेने आणि विश्वसनीय पद्धतीने परिवहन करू शकतात. ही पुढाकार स्थानिक लॉजिस्टिक्स ऑपरेशन्सला सुरळीत बनवते आणि प्रदेशाच्या आर्थिक वाढीस हातभार लावते.

हे यश नांदेड विभागाच्या मालवाहतूक सेवा सुधारण्याच्या, ऑपरेशनल कार्यक्षमता वाढवण्याच्या आणि विश्वासार्ह व ग्राहकमैत्रीपूर्ण रेल्वे परिवहन पुरवण्याच्या सातत्यपूर्ण वचनबद्धतेचे प्रतीक आहे. विभाग पुढील वर्षांमध्ये मालवाहतूक हाताळणी क्षमतेत सुधारणा करण्यासाठी नवोन्मेषी उपाय आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यास कटिबद्ध राहील, अशी ग्वाही देण्यात आली.

# एसबीआयमध्ये छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्तपणे जयंती साजरी

**नांदेड (प्रतिनिधी) –** भारतीय स्टेट बँक प्रशासकीय कार्यालय नांदेड आणि एसबीआय अधिकारी संघटना, एसबीआय सेवा संघटना, एसबीआय कर्मचारी संघटना आणि एसबीआय ओबीसी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १९ एप्रिल रोजी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती शिवाजीनगरच्या औद्योगिक शाखेत उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसबीआय प्रशासकीय कार्यालय नांदेडचे सहायक महाप्रबंधक मयंक चतुर्वेदी यांची उपस्थिती होती. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून यशवंत महाविद्यालयाचे राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. अजय गव्हाणे यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून एसबीआय सेवा संघटना नांदेड झोनचे अध्यक्ष, सदाशिव चाळणेवाड, एसबीआय सेवा संघटनेच्या डीजीएस, शिल्पा जिंतूरकर, अधिकारी संघटना महाराष्ट्र राज्य सर्कलचे उपाध्यक्ष उमेश आडगावकर, अधिकारी संघटना नांदेड मोडूलचे सीआरएस किरणकुमार जिंतूरकर, कपिल ढवळे,



अतुल पखाण, एसबीआय कर्मचारी संघटनेचे उपाध्यक्ष राहुल खेडकर यांची उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमांना पुष्प अर्पण करून दीप प्रज्वलन करण्यात आले. यावेळी शिल्पा जिंतूरकर यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख वक्ते प्रा. डॉ. अजय गव्हाणे यांनी म्हटले की, 'महामानवांनी सामाजिक समता, स्वातंत्र्य आणि बंधुभाव ही त्रिसूत्री समाजात रुजवण्याचे कार्य केले, म्हणून आपणही समाजात सामाजिक समता रुजवण्याचे काम केले पाहिजे. विज्ञानवादी विचारच आपल्याला प्रगतीकडे नेऊ शकतात. आपण श्रद्धावान असले पाहिजे, पण अंधश्रद्धेला आपल्या जीवनात धारा देऊ नये असे ते म्हणाले. किरणकुमार जिंतूरकर यांनी कार्यक्रमाची भूमिका स्पष्ट केली. अध्यक्षीय समारोप मयंक चतुर्वेदी यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंकर नरवाडे यांनी केले.

या कार्यक्रमाला नेहा गोवंदे, विठाबाई नाटकर, विनिता पांडे, वर्षा गोवंदे, छाया बैनवाड. स्वाती कांदेवार, शीतल कऱ्हाळे, सारिका पवार, मुख्य प्रबंधक गंगाधर कोंकटवार, मुख्य प्रबंधक सतीश राऊत, गिरीश विठ्ठलराव भाटे, सागर तितरमारे, ईशांत शेंडे, सौरभ राशटवार, आदित्य तिवारी यांच्यासह बँकेचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

# फँड्री

## गाणी लिहिणे खाण्याचे काम नाही, ऐकवली 'साजन'ची कथा...

'धुरंधर'मधील 'हम प्यार करने वाले' गाण्याचे लेखक समीर अंजान यांची विशेष मुलाखत



**आजवर हिंदी चित्रपटांसाठी चार हजारांहून अधिक गाणी लिहिणारे गीतकार समीर अंजान यांना एकेकाळी बँकेतील चांगली नोकरी सोडल्यानंतर प्रचंड संघर्षाला सामोरे जावे लागले होते. त्यांचे वडील अंजान हे चित्रपटसृष्टीतील एक प्रसिद्ध गीतकार होते. पण समीर यांच्या चित्रपटसृष्टीतील प्रवेशाने ते खूश नव्हते. समीर मात्र आपल्या निर्णयावर ठाम राहिले. ४० वर्षांपासून प्रेक्षकांच्या भावनांपर्यंत पोहोचणाऱ्या समीर यांनी लिहिलेले 'हम प्यार करने वाले' हे गाणे 'धुरंधर'मध्ये धुमाकूळ घालत आहे. त्यांची विशेष मुलाखत...**

### हम प्यार करने वाले... Gen Z पर्यंत पोहोचले...

अलीकडेच बॉक्स ऑफिसवर प्रचंड यशस्वी ठरलेल्या 'धुरंधर'मधील समीरचे 'हम प्यार करने वाले दुनिया से ना डरने वाले' हे गाणे पुन्हा तयार करण्यात आले आणि ते गाणे पुन्हा एकदा हिट झाले. समीरचा विश्वास आहे की, मूळ गाण्याचा आत्मा कायम ठेवून त्याचे रिक्रिएशन करणे वाईट नाही. तो म्हणतो, की माझ्या ९९ टक्के गाण्यांचे रिक्रिएशन झाले आहे. 'आँखियों से गोली मारे,' 'दिलबर दिलबर,' 'किसी हॉटेल में जाए,' 'मखना,' 'मैं तो रास्ते से जा रहा था.' आता, जर मला माझ्या एखाद्या गाण्याचे रिक्रिएशन करायचे झाले, तर मला दोनदा विचार करावा लागेल. आता 'धुरंधर'मध्ये 'हम प्यार करने वाले' गाण्याच्या निमित्ताने मी आजच्या पिढीपर्यंत पोहोचू शकलो. 'धुरंधर' जुन्या गाण्यांना सुंदरपणे पुनर्रचित करतो, म्हणूनच तो या युगातही सुपरहिट ठरला आहे. त्याआधी 'दिलबर दिलबर'ने धुमाकूळ घातला होता. पण जेव्हा तुम्ही एका चांगल्या गाण्याला वाईट शब्द जोडता, तेव्हा सर्जनशीलतेवर परिणाम होतो. असं व्हायला नको, असेही समीर म्हणाले.

### एआय शरीर आहे, आत्मा नाही...


समीर अंजान यांना जेव्हा असे विचारण्यात आले, की प्रत्येक सर्जनशील क्षेत्रात एआयचा वापर होत असलेल्या या युगात गीतलेखनासाठी ते एआयला किती मोठा धोका मानतात, तेव्हा ते हसून म्हणतात, की बघा एआयने सगळं काही केलं आहे, पण ते प्रेमात पडलेलं नाही. एआयचं कधीच हृदयभंग झालेला नाही. एआय कोणाचा मुलगा नाही, कोणाची आई नाही, त्यामुळे एआय काहीही करो, त्याला भावना कुठे मिळणार? तुम्ही त्याच्याकडून समीर अंजान यांच्यासारखी गाणी लिहून घेऊ शकता, पण तुम्हाला समीरचा आत्मा कुठे मिळेल? ते शरीर आहे, आत्मा नाही आणि आत्मा आपणच निर्माण करतो.

### 'आशिक बनाया' लिहायला अनेक दिवस लागले...

गेल्या ४० वर्षांपासून आपल्या गाण्यांमधून जवळपास दोन पिढ्यांपर्यंत प्रत्येक प्रकारची भावना पोहोचवणारे समीर म्हणतात, की गाणी लिहिणे सोपे काम नाही. कधीकधी गाणी लिहायला खूप वेळ लागतो. 'दिल' चित्रपटातील 'ओ प्रिया प्रिया' हे गाणे लिहायला अनेक दिवस लागले. आधी एक दुःखद आवृत्ती होती, मग एक अर्ध-भावनिक आवृत्ती आणि त्यानंतर तिसरे गाणे, जे प्रचंड गाजले. साजिद नाडियाडवाला यांनी 'हर दिल जो प्यार करेगा' या प्रसिद्ध गाण्यावरून चित्रपटाचे नाव ठेवले होते. त्यामुळे, गाणे लिहिताना माझ्यासमोर आव्हान होते की, त्या गाण्याशी त्याची सांगड कशी घालायची. विचार करायला मला अनेक महिने लागले आणि मग मला ब्रेकअपची ओळ सुचली: 'उसे हंसना भी होगा, उसे रोना भी होगा, हर दिल जो प्यार करेगा' 'आशिक बनाया' हे गाणे लिहायलाही मला खूप त्रास झाला. त्यासाठी अनेक दिवस लागले.

### नाहीतर मी चित्रपट सोडून देईन...

समीर सांगतात, की मी तुम्हाला एक रंजक गोष्ट सांगतो. 'साजन'मधील 'देखा है पहली बार साजन की आँखों में प्यार' हे गाणे चित्रपटात नव्हतेच. चित्रपट आधीच पूर्ण झाला होता. संगीतकार नदीम आणि श्रवण यांनी स्वतःच्या पैशाने हे गाणे रेकॉर्ड केले आणि सलमान व माधुरीला ऐकवले. ते खूप खूश झाले, त्यांनी त्यांच्या तारखा दिल्या आणि ते गाणे चित्रपटात समाविष्ट करण्यात आले. 'डॉन' चित्रपटात 'खाई के पान बनारस वाला' हे गाणे नव्हते. चित्रपटाचे लेखक जावेद अख्तर यांनी ते जबरदस्तीने चित्रपटात टाकले होते, कारण उत्तरार्धात काहीच दिलासा मिळत नव्हता. त्याचप्रमाणे दिग्दर्शक के. विश्वनाथ यांना 'सरगम' चित्रपटातील 'डफली वाले' हे गाणे अजिबात पसंत नव्हते, पण बघा ते गाणे किती गाजले. निर्माते 'कुली नं. १' मधील 'मैं तो रास्ते से जा रहा था' हे गाणे चित्रपटात घ्यायला तयार नव्हते. पण दिग्दर्शक डेव्हिड धवन यांनी स्पष्टपणे सांगितले की, जर ते गाणे समाविष्ट केले नाही, तर ते चित्रपट सोडून देतील. त्यांच्या आग्रहामुळे ते गाणे ठेवण्यात आले आणि ते प्रचंड गाजले.



चित्रपट निर्माते नागराज मंजुळे यांची विशेष मुलाखत

# कोणाला दुखावण्यासाठी चित्रपट बनवत नाही, वाईट गोष्टींविरुद्ध आवाज उठवतो

**'पिस्तुल्या' आणि 'फँड्री' यांसारख्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या चित्रपटांचे निर्माते नागराज मंजुळे यांना 'सैराट' या मराठी चित्रपटांमुळे प्रचंड प्रसिद्धी मिळाली. ते एका प्रादेशिक दिग्दर्शकापासून पॅन इंडिया चित्रपट निर्माते म्हणून उदयास आले. 'झुंड'मध्ये दिग्गज अभिनेते अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम केल्यानंतर नागराज मंजुळे सध्या विजय वर्मा अभिनीत 'मटका किंग' या सिरीजमुळे चर्चेत आहेत. विशेष मुलाखतीत त्यांनी त्यांच्या कारकिर्दीबद्दल, संघर्षाबद्दल, आर्थिक अडचणींबद्दल सांगितले.**

'झुंड'मध्ये अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम करण्याच्या आठवणीने नागराज मंजुळे आनंदीत होतात. ते म्हणतात, 'झुंड'मध्ये बच्चन साहेबांसोबत काम करताना मी खूप घाबरलो होतो. मी त्यांना विचारले की सुरुवात कशी करायची आणि ते म्हणाले, 'मला काय करायचंय? फक्त सेटवर यायचं, काम करायचं आणि निघून जायचं... त्यांच्या साधेपणाने मला प्रचंड बळ दिले.' नागराज मंजुळे यांचे



चित्रपट आणि सिरीज गरिबी आणि जातीय भेदभावाच्या खोल विषमतेवर प्रकाश टाकतात. त्यांच्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे त्यांचे पालनपोषण वडिलांऐवजी त्यांच्या काकांनी केले. ते सांगतात, की सोलापूरच्या एका छोट्या गावातून बॉलिवूडपर्यंतचा त्यांचा प्रवास खूप खडतर होता. जेव्हा मी माझ्या प्रवासाकडे मागे वळून पाहतो. तेव्हा माझा विश्वासच बसत नाही की मी तिथून इथपर्यंत पोहोचू शकलो...



### संघर्षाचा आनंद घेतला...

नागराज सांगतात, की मी रोज माझ्या घरापासून कॉलेजपर्यंत १५० किलोमीटरचा प्रवास करायचो. मी पहाटे ५ वाजता उठून पुणे विद्यापीठाला जाणारी सकाळी ६ ची ट्रेन पकडायचो. स्टेशनवरून विद्यापीठापर्यंत बसचे तिकीट परवडत नसल्यामुळे मी चालत जायचो. परत येतानाही तोच दिनक्रम असायचा, पण ते कधीच फार मोठे वाटले नाही. कारण त्या दिवसांत काहीतरी करण्याची आणि काहीतरी बनण्याची इच्छा खूप प्रबळ होती. माझे मित्र खूप चांगले होते आणि ते आजही माझ्यासोबत आहेत. त्यांच्यापैकी एक जण आता कॉलेजमध्ये प्राध्यापक झाला आहे. आज मी मागे वळून पाहतो आणि त्या नागराज मंजुळेची आठवण येऊन रडतो, पण त्या वेळी माझ्याकडे रडायलाही वेळ नव्हता, असे ते म्हणाले. नागराज यांनी मागासलेल्या वर्गाला मिळणाऱ्या वागणुकीवर भाष्य करणारे अनेक चित्रपट बनवले आहेत. त्यांच्या राष्ट्रीय पुरस्कार विजेत्या 'पिस्तुल्या', 'सैराट', 'झुंड', 'घर बंदूक बिर्याणी' आणि अलीकडील 'मटका किंग' यांसारख्या प्रोजेक्ट्सनी जातीय भेदभाव आणि सामाजिक समस्यांवर भाष्य केले आहे.

### कामाला इतका प्रतिसाद, मग का घाबरू?

आजच्या सामाजिक-राजकीय वातावरणाचा एक चित्रपट निर्माता म्हणून त्यांच्या सर्जनशीलतेवर परिणाम होतो का? यावर ते म्हणतात, की चित्रपट बनवताना माझे हेतू स्पष्ट असतात. कोणालाही दुखावण्याच्या हेतूने मी चित्रपट बनवत नाही. मी आपल्या समाजातील वाईट आणि अमानुषतेविरुद्ध आवाज उठवतो. मला महत्त्वाचे वाटणाऱ्या विषयांवर मी चित्रपट बनवतो. मला माझे स्वतःचे चित्रपट बनवण्याची भीती वाटत नाही. काहींना तुमचे काम आवडेल, काहींना नाही. मला भीती वाटत नाही. माझ्या कामाला इतका चांगला प्रतिसाद मिळत असताना मी का घाबरू?

### 'ये खेल छलांग है या उम्मीदों का जहर?'

आपल्या सिरीजमध्ये मटकासारख्या जुगाराच्या खेळाचे जग निर्माण करणारे नागराज मंजुळे स्वतः मटका खेळल्याचे कबूल करतात. ते म्हणतात, की हो, हे खरं आहे की मी माझ्या तरुणपणी मटका खेळायचो. मी तो कधीच जिंकलो नाही. मी अधूनमधून लॉटरीचे तिकीटही घ्यायचो. मला आठवतंय दिवाळीत जेव्हा लक्ष्मी बंपर लॉटरी असायची, तेव्हा मी तिकीट विकत घ्यायचो. मी माझ्या वडिलांच्या खिशातही लॉटरीची तिकिटे बघायचो. ते खूप मजेचे दिवस होते. लॉटरी खूप आशा द्यायची, असे ते म्हणाले. एकदा मी दहा रुपयांची लॉटरी जिंकली होती. पण त्यानंतर माझ्या आशा वाढल्या. आमच्या मालिकेत वापरलेल्या संवादाप्रमाणे, 'ये खेल छलांग है या उम्मीदों का जहर?' अर्थात, मी कधी लॉटरी जिंकली नाही. (हसतात.) जेव्हा निर्मात्यांनी हा विषय घेऊन माझ्याशी संपर्क साधला, तेव्हा मला तो खूप मनोरंजक वाटला. कारण मला लहानपणापासूनच मटकासारख्या जुगाराबद्दल माहिती होती. मी लहान असताना हा खेळ बाहेरून पाहत होतो, पण जेव्हा मी या खेळाच्या जगात शिरलो, तेव्हा मला तो खूपच रंजक वाटला, असे नागराज म्हणाले.



विशेष मुलाखत : आधीच ठरवले होते, स्वत :च्या चित्रपटात काम करणार नाही...

# 2017 पासून निर्माती व्हायचे होते : पत्रलेखा

**अभिनयानंतर चित्रपट निर्मिती क्षेत्रात उतरलेल्या बॉलिवूड अभिनेत्रींच्या यादीत आता पत्रलेखाच्या नावाची भर पडली आहे. पत्रलेखाचा निर्माता म्हणून पहिला चित्रपट 'टोस्टर' ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित झाला आहे. यात तिचा पती राजकुमार राव आणि सान्या मल्होत्रा मुख्य भूमिकेत आहेत. चित्रपटाला चांगला प्रतिसाद मिळत आहे. 'सिटी लाइट्स' या चित्रपटात आणि 'बोस : डेड/अलाइव्ह' या वेब सीरिजमध्ये राजकुमार रावसोबतच्या तिच्या जोडीचे खूप कौतुक झाले असताना, तिने स्वतःच्याच चित्रपटात नायिकेची भूमिका का केली नाही, असे विचारले असता, तिने स्पष्टपणे सांगितले, की स्वतःच्याच चित्रपटात काम न करण्याचा निर्णय आधीच घेतला होता. तिचा चित्रपट एका कंजूष व्यक्तीची कथा आहे. हा विषय निघाल्यावर एक उत्सुकतापूर्ण प्रश्न निर्माण झाला: खऱ्या आयुष्यात राजकुमार राव जास्त कंजूष आहे की ती स्वतः? या ३६ वर्षीय नवमातेने याचे मनमोकळेपणाने उत्तर दिले...**

शिलाँग येथील एका बंगाली कुटुंबात जन्मलेल्या पत्रलेखाने २०१४ मध्ये 'सिटी लाइट्स' या चित्रपटाद्वारे आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. तेव्हापासून तिने 'लव्ह गेम्स', 'नानू की जानू', 'बदनाम गली', 'वाईल्ड वाईल्ड पंजाब' आणि 'फुले' यांसारख्या चित्रपटांमध्ये दमदार अभिनय सादर केला आहे. ती पुढे 'सूर्यास्त'मध्ये दिसणार आहे.

» २०१७ पासून निर्माती बनायचे होते : पत्रलेखा म्हणाली, की मला २०१७ पासून निर्माती व्हायचे होते. ती 'टोस्टर'च्या निर्मितीबद्दल आणि निर्माती बनण्याबद्दल सांगते, की मी सुरुवातीपासूनच हे स्पष्ट केले होते की, जेव्हा मी एखाद्या चित्रपटाची निर्मिती करेन, तेव्हा मी स्वतः त्यात अभिनय करणार नाही. कारण कॅमेऱ्यामागे मी जे काही करेन, ते उत्तम प्रकारे करेन.

» प्रॉडक्शनमध्ये २४ तास, ३६५ दिवस काम : पत्रलेखा म्हणाली, की माझ्या आयुष्याचा उद्देश कदाचित १० गोष्टी न करता फक्त एकच गोष्ट करणे, पण त्यात १००% योगदान देणे आहे. त्यामुळे मी कॅमेऱ्यासमोर न येण्याचे ठरवले होते. खरं सांगायचं तर मी या प्रवासाचा खूप आनंद घेतला आहे. एक चित्रपट बनवण्यासाठी किती प्रचंड मेहनत घ्यावी लागते, याची आम्हाला कलाकार म्हणून कल्पना नसते. प्रॉडक्शन हे २४ तास, ३६५ दिवस चालणारे काम आहे. माझ्यासाठी हे सोपे झाले. कारण



दिग्दर्शक विवेक दास चौधरीपासून ते सान्या मल्होत्रा आणि फराह खानपर्यंत, आम्ही सर्व मित्र आहोत. राजकुमार हा इथलाच अभिनेता आहे, त्यामुळे ते फारसे कठीण नव्हते. मला वाटतं,



भविष्यात जेव्हा मी कॅमेऱ्यासमोर एखादी भूमिका साकारेन, तेव्हा हा अनुभव खूप उपयोगी पडेल.

» राजकुमार नाही, मी कंजूस आहे... : 'टोस्टर'मध्ये राजकुमार राव एका अत्यंत कंजूस नवऱ्याची भूमिका साकारतो. तो खऱ्या आयुष्यातही तसाच आहे का? या प्रश्नाला उत्तर देताना, पत्रलेखा पूर्ण प्रामाणिकपणे आणि स्पष्टपणे म्हणते, नाही, राज अजिबात कंजूस नाही. आमच्यापैकी मीच जास्त कंजूस आहे. ती पुढे हसत हसत सांगते, मी तर चित्रपटाचा दिग्दर्शक विवेक, जो माझा बालपणीचा मित्र आहे, त्याला मला जेवायला बाहेर घेऊन जायला सांगितले होते आणि जेव्हा बिल देण्याची वेळ यायची, तेव्हा मी बिल त्याच्या हातात देऊन निघून जायचे.

» मुलगी झाल्यावर नात्यात किती बदल? : पत्रलेखा आणि राजकुमार राव आधी मित्र होते, मग जीवनसाथी. ते २०१० पासून एकत्र आहेत. १५ नोव्हेंबर २०२१ रोजी त्यांनी पती-पत्नी म्हणून नवीन आयुष्य सुरू केले. आता त्यांना पार्वती पॉल राव नावाची एक मुलगी आहे. हा एक रंजक योगायोग आहे की त्यांच्या मुलीचा जन्म १५ नोव्हेंबर २०२५ रोजी, त्यांच्या लग्नाच्या चौथ्या वाढदिवशी झाला. पालक झाल्यावर त्यांच्या नात्यात बदल झाला आहे का? पत्रलेखा म्हणते, नाही. पालक झाल्यापासून मी आणि राज अजिबात बदललो नाही. आम्ही पहिल्या दिवसापासून मित्र आहोत आणि आजही मित्रच आहोत. आमचं नातं टिकण्याचं कारण म्हणजे आम्ही खूप चांगले मित्र आहोत.

## देव न करो, मला कंजूस नवरा मिळो : सान्या मल्होत्रा

'दंगल', 'बधाई हो', आणि 'जवान' यांसारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांची अभिनेत्री सान्या मल्होत्रा अलीकडेच तिच्या 'मिसेस' या भावनिक चित्रपटामुळे चर्चेत होती. तिला 'न्यूयॉर्क इंडियन फिल्म फेस्टिवलमध्ये या चित्रपटासाठी उत्कृष्ठ अभिनेत्री म्हणून पुरस्कारही मिळाला होता. आता ती तिच्या 'टोस्टर' या विनोदी चित्रपटामुळे चर्चेत आहे. सान्या म्हणते की, आतापर्यंतच्या चित्रपटांमध्ये भावनिक भूमिका साकारल्यानंतर ती 'फील-गुड' भूमिकेच्या




शोधात होती. या चित्रपटात काम करणे माझ्यासाठी खूप मजेशीर अनुभव होता. मी आतापर्यंत विनोदी भूमिका केली नव्हती. बहुतेक करून नाट्यमय चित्रपट केले आहेत. ते सुद्धा खूप भावनिक होते, त्यामुळे विनोदी भूमिका करणे हा एक छान बदल होता...

सान्या सांगते, की मला मजेशीर चित्रपट पाहायलाही आवडतात. टोस्टर चित्रपटातील माझ्या सह-कलाकारांची कॉमिक टायमिंग इतकी अप्रतिम आहे की त्यांना अभिनय करताना पाहणे खूप मजेशीर वाटते. उदाहरणार्थ राज (राजकुमार राव) आणि अभिषेक (बॅनर्जी) यांनी जी प्रसंगावधानता दाखवली ती कमाल आहे. चित्रपटात सान्याचा नवरा अत्यंत कंजूष आहे. खऱ्या आयुष्यात कंजूष नवरा चालेल का? असे विचारल्यावर ती म्हणते, देव न करो, मला कंजूष नवरा मिळो. जर मला कळले की तो बाहेर जेवण्याच्या बहाण्याने भंडाऱ्यात घेऊन आला तर... मी तशी कल्पनाही करू शकत नाही. मी स्वतः कंजूष आहे. मी नेहमीच विचारपूर्वक खर्च करणारी आहे आणि कोणतीही वस्तू खरेदी करण्यापूर्वी काळजीपूर्वक विचार करते, पण कंजूष नवरा चालणार नाही, असे ती म्हणाली.

# उष्माघाताचा कहर! लातूरमध्ये ९ महिन्यांच्या बाळाच्या मृत्यूचा संशय; मृतांचा आकडा दोनवर

**लातूर(प्रतिनिधी)–** लातूर जिल्ह्यात वाढत्या उष्णतेमुळे उष्माघाताच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ होत आहे. औसा तालुक्यातील गोंद्री गावात नऊ महिन्यांच्या बाळाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून लातूर जिल्ह्यात तापमानात सातत्याने वाढ होत असून दुपारच्या सुमारास तापमान ४० ते ४१ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचत आहे. तीव्र उन्हामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी वर्ग यांना उष्माघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

सतत वाढणाऱ्या तापमानामुळे उष्माघाताच्या घटनांमध्ये वाढ होत आहे. विशेषतः ग्रामीण भागात दुपारच्या वेळेत काम करणाऱ्या नागरिकांवर याचा अधिक परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.

चार दिवसांपूर्वी औराद शहाजनी येथे ६० वर्षीय शेतकऱ्याचा उष्माघाताने मृत्यू झाला होता. त्यानंतर आता गोंद्री येथील बाळाच्या मृत्यूची घटना समोर आल्याने जिल्ह्यातील मृतांचा आकडा दोनवर पोहोचला आहे.

या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाने नागरिकांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन केले आहे. अत्यावश्यक कामांशिवाय दुपारच्या कडक उन्हात बाहेर पडू नये, पुरेसे पाणी प्यावे, हलके आणि सैल कपडे परिधान करावेत, तसेच लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत.

**अहिल्यानगरमध्ये उष्माघाताचा बळी**

अहिल्यानगरच्या पारनेर तालुक्यातील पिंपळगाव रोठा येथील जिल्हा परिषद शिक्षिका उषा फापाळे या ५० वर्षीय महिलेचा उष्माघातामुळे मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त होत आहे. उषा फापाळे या दररोजप्रमाणे सकाळी गारगुंडी येथून दुचाकीवरून पिंपळगाव रोठा येथे शाळेत गेल्या होत्या. सध्या शाळा सकाळी भरत असल्याने दुपारी बारा वाजताच्या सुमारास शाळा सुटल्यानंतर त्या प्रखर उन्हातच परतीच्या प्रवासाला निघाल्या.

घरी पोहोचल्यानंतर त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. अंगात अशक्तपणा, चक्कर येणे अशी लक्षणे दिसू लागल्याने त्यांना तातडीने कान्हूर पठार येथील खासगी रुग्णालयात नेण्यात आले. डॉक्टरांनी प्राथमिक तपासणीनंतर पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथे हलविण्याचा सल्ला दिला. मात्र, प्रकृती झपाट्याने खालावत गेल्याने उपचार सुरू होण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. या अगोदर ढवळपुरी येथील माळवडीमधील महिलेचा शेतात काम करताना मृत्यू झाला आहे.

# शिक्षकांसाठी ई-केवायसी अनिवार्य; मे महिन्याच्या वेतनावर परिणाम होण्याची शक्यता

**मुंबई :** राज्य शासनाच्या वित्त विभागाने दिलेल्या आदेशानुसार शालार्थ प्रणालीद्वारे वेतन घेणाऱ्या सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी बँक खात्याची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. ही प्रक्रिया वेळेत पूर्ण न झाल्यास मे महिन्याचे वेतन रोखले जाण्याची शक्यता असल्याने शिक्षक संघटनांनी तातडीने कार्यवाहीचे आवाहन केले आहे.

राज्य शासनाने २७ मार्च २०२६ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार शासकीय, निम शासकीय तसेच अनुदानित संस्थांमधील सर्व कर्मचाऱ्यांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे बंधनकारक आहे. मात्र, अंमलबजावणीदरम्यान अनेक शिक्षकांना तांत्रिक अडचणी येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने सविस्तर मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. शिक्षकांनी आपले आधार कार्ड कोणत्या बँक खात्याशी लिंक आहे याची पडताळणी एनपीसीआय किंवा आधारच्या अधिकृत संकेतस्थळावरून करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.




जर आधार क्रमांक पगार खात्याशी जोडलेला असेल तर स्वतंत्र ऑनलाइन प्रक्रिया आवश्यक नसून केवळ ई-केवायसी फॉर्म भरून बँकेत पडताळणी करावी लागेल. मात्र, आधार इतर खात्याशी लिंक असल्यास एनपीसीआय पोर्टलवर जाऊन पगार खाते अद्ययावत करणे आवश्यक आहे. तसेच नाव, जन्मतारीख किंवा इतर तपशीलांमध्ये तफावत असल्यास ती तातडीने दुरुस्त करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.

या संदर्भात समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी सर्व शिक्षकांनी वेळेत ई-केवायसी पूर्ण करावी, जेणेकरून वेतन अडचणीत येणार नाही, असे आवाहन केले आहे. ही माहिती राज्य प्रसिद्धीप्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.

एकूणच, प्रशासकीय आदेश आणि तांत्रिक प्रक्रिया यांचा समतोल राखत शिक्षकांनी तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# मध्य भारतातील रुग्णांना मिळणार अत्याधुनिक मल्टी स्पेशालिटी व सुपर स्पेशलिटी सुविधा



**नागपूर(प्रतिनिधी)–**जागतिक दर्जाच्या अत्याधुनिक वैद्यकीय सुविधांनी सुसज्ज अशा ४६१ बेडची सुविधा असलेल्या नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट या मध्य भारतातील अत्याधुनिक मल्टीस्पेशालिटी आणि सुपर स्पेशलिटी रुग्णालयाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या उपस्थितीत झाले.

धरमपेठ येथील नॉर्थ अंबाझरी मार्गावरील डॉ. आबाजी थत्ते सेवा अनुसंधान संस्थेच्या वतीने हा वैद्यकीय प्रकल्प सुरू होत आहे. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अर्थ राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, महापौर नीता ठाकरे, माजी सरकार्यवाहक भैय्याजी जोशी, संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, उपाध्यक्ष अजय संचेती, सचिव शैलेश जोगळेकर, कोषाध्यक्ष आनंद औरंगाबादकर आदी उपस्थित होते.

नॅशनल हेल्थ केअर इन्स्टिट्यूट ही मध्य भारतातील सर्वात मोठी आणि अत्याधुनिक मल्टी स्पेशलिटी व सुपर स्पेशलिटी संस्था म्हणून सुरू होत असून २३ मजली सुसज्ज इमारत असलेल्या या हॉस्पिटलमध्ये हेलिपॅडची सुविधा असून एअर म्बुलन्ससुद्धा उपलब्ध होणार आहे. अत्याधुनिक उपचारांच्या सुविधांसोबतच अवयव प्रत्यारोपण व बर्न वॉर्ड राहणार असून ४६१ बेडची सुविधा तसेच रुग्णांच्या सुविधेसाठी अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचे संस्थेचे सचिव शैलेश जोगळेकर यांनी यावेळी सांगितले. अवयव प्रत्यारोपण सुविधेवर विशेष भर दिला जाणार आहे.

सिंगापूरच्या एस. के. या जागतिक दर्जाच्या वास्तू विशारद संस्थेतर्फे हा प्रकल्प तयार करण्यात आला आहे. येथे मेडिकल प्लॅनिंग आर्किटेकला सर्वाधिक प्राधान्य देण्यात आले आहे.

नॅशनल हेल्थकेअर इन्स्टिट्यूट सुमारे पाच लाख चौरस फुट क्षेत्रावर उभारले जाणार असून नागपूर परिसर तसेच मध्य भारतातील रुग्णांच्या गरजा लक्षात घेऊन या प्रकल्पाची संकल्पना करण्यात आली आहे. येथे म ल्टीस्पेशालिटी तसेच सुपर स्पेशलिटी अंतर्गत जेरियाट्रिक रूमेट्रोलॉजी, हृदय व रक्तवाहिन्या, न्यूरोलॉजी, नेफ्रॉलॉजी, युरोलॉजी, क्रीडा वैद्यक प्लास्टिक व पुनर्रचना आदी सुविधा राहणार आहेत. या संस्थेमध्ये पदव्युत्तर व सुपर स्पेशलिटी अभ्यासक्रमासाठी पूर्ण सुसज्ज शैक्षणिक सुविधा असतील अशी माहिती संस्थेचे सचिव शैलेश जोगळेकर यांनी दिली.

स्वागत संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुनील मनोहर, सचिव शैलेश जोगळेकर यांनी केले. कार्यक्रमास वैद्यकीय क्षेत्रातील तसेच विशेष निमंत्रित मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन मेघा दीक्षित यांनी केले.

# भोंदू मनोहर भोसलेला ३ दिवसांची पोलीस कोठडी; आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी साथीदारासह कारवाई

**सोलापूर (प्रतिनिधी)** –जिल्ह्यातील कुर्डूवाडीत भोंदूगिरी आणि फसवणूक प्रकरणात मोठी कारवाई करण्यात आली आहे. व्यवसायात भरभराटीचे आमिष दाखवून एका तरुणाची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी भोंदू मनोहर भोसले आणि त्याचा साथीदार विशाल वाघमारे यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणात दोघांना न्यायालयात हजर करण्यात आले असता माढा दिवाणी आणि फौजदारी न्यायालयाने त्यांना ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.

मनोहर भोसले आणि विशाल वाघमारे यांच्या वतीने ॲड. सुभाष हल्याळकर यांनी युक्तिवाद केला. त्यांनी अटक बेकायदेशीर असल्याचा दावा करत गुन्ह्यातील कलमे ७ वर्षांखालील असल्याने नोटीस देऊन अटक करायला हवी होती, असा युक्तिवाद मांडला.

सरकारी पक्षाच्या वतीने जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रदिपसिंग राजपूत यांनी युक्तिवाद करत भोसले हा सराईत गुन्हेगार असल्याचे नमूद केले. तसेच त्याच्याविरोधात यापूर्वीही अनेक गुन्हे दाखल असल्याने पुढील तपासासाठी पोलीस कोठडी आवश्यक असल्याचे सांगितले.

दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायाधीशांनी मनोहर भोसले आणि विशाल वाघम रे यांना ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. या निर्णयामुळे तपासाला गती मिळण्याची शक्यता आहे.

या प्रकरणातील तक्रारींची दखल घेत पोलिसांनी तपास सुरू केला होता. पुण्यातील मांजरी परिसरातून मनोहर भोसलेला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याविरोधात कुर्डूवाडी पोलीस ठाण्यात फसवणूक आणि जादूटोणा प्रकरणी गुन्हे दाखल आहेत.

मनोहर भोसलेचा सोलापूरच्या करमाळा तालुक्यातील घोटी येथे २७ एकरात पसरलेला आलिशान आश्रम असल्याची माहिती समोर आली आहे. येथे दर अमावस्येला मोठ्या प्रमाणात लोकांची गर्दी होत असे. बाबाला भेटण्यासाठी ११ हजार रुपयांची फी घेतली जात असल्याचंही समोर आलं आहे.

# सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा उसळी!

**मुंबई(प्रतिनिधी)–**जागतिक बाजारातील अनिश्चिततेचा परिणाम देशातील सराफा बाजारावर दिसून येत असून २५ एप्रिल रोजी सोने-चांदीच्या किमतींमध्ये हलकी वाढ नोंदवली गेली आहे. मध्यपूर्वेत सुरू असलेल्या तणावामुळे गुंतवणूकदार सावध भूमिका घेत असून सुरक्षित गुंतवणूक म्हणून सोने-चांदीकडे कल वाढताना दिसत आहे.

मागील व्यवहार सत्रात मल्टी कमोडिटी एक्सचेंजवर सोने-चांदी तेजीसह बंद झाले होते. तसेच आंतरराष्ट्रीय बाजारातही किमतींम ध्ये सौम्य वाढ दिसून आली आहे. अमेरिका आणि इराण यांच्यात वाढत्या तणावामुळे गुंतवणूकदार सतर्क झाले असून गेल्या काही दिवसांपासून या सोने आणि चांदीच्या दरात चढ-उतार सुरू आहेत.

ताज्या आकडेवारीनुसार, MCX वर मे डिलिव्हरीसाठी चांदीच्या दरात १.३८ टक्क्यांची वाढ होऊन ती २,४४,८४५ रुपये प्रति किलोवर पोहोचली. तर सोनेही ०.७० टक्क्यांच्या वाढीसह बंद झाले. आंतरराष्ट्रीय बाजारात Comex वर सोने ४,७२५.४० डॉलर प्रति औंस दराने व्यवहार करत असून चांदी ०.२४ टक्क्यांच्या वाढीसह ७५.६८५ डॉलर प्रति औंसवर पोहोचली आहे.

दिल्ली, मुंबई आणि कोलकाता येथे १० ग्रॅम चांदीचा दर २,६०० रुपये आहे. १०० ग्रॅम चांदीसाठी २६,००० रुपये मोजावे लागत आहेत. चेन्नईमध्ये १० ग्रॅम चांदीचा दर २,७०० रुपये आहे.

# जागतिक हिवताप दिनानिमित्त विविध उपक्रम

## ■ किटकजन्य आजारांवर नियंत्रण मिळविण्यात राज्याची यशस्वी वाटचाल

**मुंबई(प्रतिनिधी)–** राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत दिनांक २५एप्रिल २०२६ रोजी जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात येणार आहे. हिवतापाविषयी जनतेम ध्ये जागृती निर्माण होऊन हिवतापविरोधी उपाययोजनांच्या अंमलबजावणी मध्ये त्यांचा सक्रिय सहभाग प्राप्त करून घेण्याच्या दृष्टीने दरवर्षी विविध उपक्रमांद्वारे जनतेपर्यंत माहिती पोहोचविण्याचा प्रयत्न करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. किटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी अनेक उपक्रमांम धून विविध उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत असल्याने किटकजन्य आजारांवर नियंत्रण मिळवून सन २०३० पर्यंत टप्प्या-टप्प्याने हिवताप दुरीकरणाकडे राज्याची यशस्वी वाटचाल सुरू आहे.

राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाच्या प्रमुख उद्दिष्टांपैकी हिवताप दुरिकरण (२०१६- २०३०) हे उद्दिष्ट साध्य करणेकरिता हिवताप दुरिकरण मोहीम हा कार्यक्रम राबविला जात आहे. वर्ष २०३० पर्यंत हिवताप दुरिकरण करणे हे ध्येय आहे. त्याअनुषंगाने राज्याने २१ डिसेंबर २०२१ रोजी हिवताप रोग अधिसूचित केला आहे.

हिवताप समस्याग्रस्त भागात आरोग्य विभागाच्या वतीने विशेष मोहीम राबविण्यात येते. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये डास नियंत्रणासाठी उपाययोजना म्हणून राज्यातील हिवतापासाठी अतिसंवेदनशील निवडक व उद्रेकग्रस्त गांवामध्ये किटकनाशकाची घरोघर फवारणी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे तापाच्या साथीच्या नियंत्रणासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचे ताप रुग्ण सर्वेक्षण आरोग्य कर्मचारी, आरोग्य सेविका, आशा यांच्यामार्फत मोहीम राबविली जात आहे. राज्यात सन २०२५ मध्ये २३,२४७ हिवतापबाधित रुग्णांची तपासणी करून त्यांच्यावर उपचार करण्यात आले आहेत. या वर्षी २१ एप्रिल २०२६ अखेर २,७२० हिवताप बाधित रुग्ण आढळून आले आहेत त्यापैकी २३६ रुग्ण हे ळाीींशिव (बाहेरून आलेले - स्थानिक नसलेले) आहेत.

हिवताप प्रतिरोध महिना जून - केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जनतेमध्ये हिवताप कार्यक्रमाविषयी जागृती निर्माण करण्यासाठी दरवर्षीप्रमाणे जूनमध्ये हिवताप प्रतिरोध महिना विविध उपक्रमांद्वारे राबविण्यात येणार आहे. गणेशोत्सव तसेच नवरात्रोत्सवाम ध्ये जनतेमध्ये किटकजन्य आजारांविषयी विविध माध्यमांद्वारे जनजागृती करण्यात येते.

# हॉकीपटू गुरबक्ष सिंग ग्रेवाल यांचे निधन



**मुंबई(प्रतिनिधी)–** भारतीय हॉकीचे दिग्गज खेळाडू व १९६८ ऑलिम्पिक कांस्यपदक विजेते गुरबक्स सिंग ग्रेवाल यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते, त्यांनी झिराकपूर येथे अखेरचा श्वास घेतला.

हॉकी इंडियाने त्यांच्या निधनाची पुष्टी केली आहे. हॉकी इंडियाच्या माहितीनुसार,गुरबक्ष सिंग ग्रेवाल हे १९६८ च्या मेक्सिको सिटी ऑलिम्पिकमध्ये देशासाठी कांस्यपदक जिंकणाऱ्या भारतीय संघाचा भाग होते.

**टी. सी. हरवली**

माझी सीमा रामदास जाधव या नावाची दहावी पास टी. सी. हडको ते नांदेड दरम्यान ऑटो प्रवासात हरवली आहे. ज्यांना कोणाला सापडली असेल त्यांनी कृपया खालील मोबाईल नंबरवर संपर्क साधावा. मो. नं.८४२१६७३१४२.

**Change In Name**

My old name is **SULBHA RAMKISHAN PUROHIT** which now I am changing as new name **MAMTA RAMKISHAN PUROHIT** Henceforth, all my correspondence will be done as per my new name. Please consider the same. **Sign By - MAMTA RAMKISHAN PUROHIT** 4-1-229 Shree Sahayog Seva Maharana Ranjitsingh Market Mondha Opp. Bindu Mangal Karyalay Juna Mondha, Nanded-431604

# भटके-विमुक्त समाजाच्या समस्या निवारणासाठी त्रिस्तरीय समित्या -मंत्री सावे

**मुंबई(प्रतिनिधी)–**राज्यातील भटके-विमुक्त समाजाच्या समस्या प्रभावीपणे सोडविणे, त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणे तसेच या समाजावर होणाऱ्या अमानवीय अत्याचारांच्या घटनांना आळा घालण्यासाठी त्रिस्तरीय समित्या स्थापन करण्यात आल्या असल्याची माहिती इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी दिली.

मंत्री अतुल सावे म्हणाले, राज्यस्तर, जिल्हास्तर आणि उपविभाग स्तरावर समित्यांच्या माध्यमातून भटके-विमुक्त समाजाच्या तक्रारींचे तातडीने निवारण, अत्याचारांच्या घटनांवर त्वरित कारवाई आणि विविध शासकीय योजनांची प्रभावी अंम लबजावणी केली जाणार आहे. या निर्णयाम ुळे भटके-विमुक्त समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाला गती मिळेल. तसेच अत्याचारांच्या घटनांमध्ये घट होण्यास मदत होईल.

राज्यस्तरीय समितीच्या अध्यक्षपदी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री असतील, तर विभागाचे सचिव सदस्य म्हणून कार्य करतील. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, पुणे हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील. तसेच सह सचिव किंवा उप सचिव यांच्यासह भटके-विमुक्त समाजासाठी कार्य करणाऱ्या सहा अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यात किमान एका म हिलेचा समावेश राहील.

जिल्हास्तरीय समिती जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत राहील. या समितीत पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा जात पडताळणी अधिकारी तसेच सहाय्यक संचालक (इतर मागास बहुजन कल्याण) यांचा समावेश असेल. याशिवाय भटके-विमुक्त समाजातील चार अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात येणार असून त्यात किमान एका महिलेचा समावेश राहील.

उपविभाग स्तरावर उपविभागीय अधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाईल. या समितीत उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षण अधिकारी तसेच संबंधित पोलीस ठाण्याचे अधिकारी यांचा समावेश असेल. त्याचबरोबर भटके-विमुक्त समाजातील दोन अशासकीय सदस्यांची नियुक्ती केली जाणार आहे.

भटके-विमुक्त समाजावरील अत्याचारांच्या घटनांची तात्काळ दखल घेऊन प्रथम माहिती अहवाल (एफआय आर) नोंदविणे, पीडितांना वैद्यकीय व कायदेशीर मदत उपलब्ध करून देणे आणि योग्य तपास करणे ही समितीची प्रमुख जबाबदारी राहील. समाजात कायदेविषयक जागरूकता वाढविण्यासाठी मार्गदर्शन शिबिरे आयोजित केली जातील.

तसेच आरोग्य तपासणी, शासकीय योजनांची माहिती व लाभ देणे, अंधश्रद्धा निर्मूलन आणि समाजात सन्मानपूर्वक वागणूक मिळावी यासाठी जनजागृती केली जाईल. शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे, शाळांमध्ये प्रवेश मिळवून देणे आणि शैक्षणिक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

याशिवाय भटके-विमुक्त समाजाला मूलभूत सुविधा जसे रस्ते, वीज, पाणी, घरे उपलब्ध करून देण्यासाठी समन्वय साधला जाईल तसेच रोजगाराभिमुख योजनांद्वारे आर्थिक सक्षमीकरणाला चालना दिली जाईल. वसंतराव नाईक विकास महामंडळाच्या योजनांच्या अंमलबजावणीतही सम न्वय ठेवला जाईल.

तक्रारींचे निवारण वेळेत व्हावे यासाठी स्पष्ट कार्यपद्धती ठरविण्यात आली आहे. प्राप्त तक्रारींवर १० दिवसांत कार्यवाही सुरू करणे बंधनकारक असेल. उपविभाग किंवा जिल्हा स्तरावर कार्यवाही न झाल्यास नागरिकांना राज्यस्तरीय समितीकडे दाद मागता येईल.

तसेच जिल्हा व उपविभाग स्तरावर वर्षातून किमान चार बैठका घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. समित्यांच्या कामकाजाचा अहवाल नियमितपणे शासनाकडे सादर केला जाणार आहे. याबाबतचा शासन निर्णय इतर मागास बहुजन कल्याण विभागाने निर्गमित केला असून महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**Change In Name**

My old name is **SANDVE KAVITA ASHOKRAO** which now I am changing as new name **KAVITA BABU LANDGE** Henceforth, all my correspondence will be done as per my new name. Please consider the same. **Sign By - BABU ASHOKRAO LANDGE H. No.** 7-3-855 Near WATER TANK Shakti Nagar, Sai Nagar, Nanded-431604

Mo. No. 8421441234

**नगरपरिषद, उमरी जि. नांदेड** जा. क्र./सीआर/८१४/२०२६

**जाहिरात प्रगटन** दि. २३/४/२६

**(नांव परिवर्तन करणे बाबत)**

श्री कमलाकांत रामचंद्रराव उत्तरवार रा. उमरी सर्व्हे नं. १२७/२ पैकी प्लॉट नं. ५० चा दक्षिणेकडील भाग, वार्ड नं. १५, झोन क्र. १, न.पा.मा.क्र. १३७/२, नवीन मालमत्ता क्र. १५३४ या जाहीर प्रगटनाद्वारे उमरी नगरवासियांना जाहीररित्या कळविण्यात येते की, बाबुराव बंकटलाल सारडा रा. उमरी यांच्या नावे असलेली मालकी हक्काची उमरी उमरी सर्व्हे नं. १२७/२ पैकी प्लॉट नं. ५० चा दक्षिणेकडील भाग, वार्ड नं. १५, झोन क्र. १, न.पा.मा.क्र. १३७/२, नवीन मालमत्ता क्र. १५३४ ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.

पूर्वेस - ९ मीटरचा रस्ता, पश्चिमेस - राजेश भगवान यांचा प्लॉट, दक्षिणेस - ९ मीटरचा रस्ता, उत्तरेस - प्लॉट क्र. ५० चा भाग.

खरेदीखत बैनामा रजिस्ट्री / वाटणी पत्र क्र. ४३१ दि. १८/०३/२०२६ आधारे खरेदी केली आहे. वाटणीनुसार हिश्यास आली आहे. म्हणून नगरपालिकेच्या मालमत्ता रव्हिजन रजिस्टरमध्ये कमलाकांत रामचंद्रराव उत्तरवार यांच्या नावे नोंद घेण्यात येत आहे. ज्या कोणा नातेवाईक व हितसंबंधितांना वरील प्रमाणे नाव परिवर्तन होत असल्याबाबत आक्षेप असेल तर त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपला लेखी आक्षेप सबळ पुराव्यासह या कार्यालयात सादर करावा. नसता मुदत संपल्यानंतर अर्जदाराचे नाव मालमत्ता रिव्हीजन रजिस्टरमध्ये नोंदविण्यात येईल.

**मुख्याधिकारी**
**नगरपरिषद, उमरी ता. उमरी जि. नांदेड**

**ऑफिसची जागा त्वरीत विकणे आहे.**

नांदेड शहरातील मनपा अंतर्गत आनंदनगर येथील राज मॉल मधील ऑफिसची जागा क्र. २१० ज्याचे एकूण क्षेत्रफळ ७७२ चौ.फुट आहे. त्यामध्ये बाथरूमचा समावेश असून ही ऑफिसची जागा त्वरीत विक्री करणे आहे.इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**संपर्क नंबर**

**दिनेश कुलकर्णी** ९७६४१२३५९३

**तानाजी घोगरे** ७८४१८६५२८७



रामबाण ईलाज

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

सेवा क्लिनीक

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



## अर्थव्यवस्थेला बळ देणारे गोदावरी अर्बनचे कार्य कौतुकास्पद -ना. डॉ. पंकज भोयर




**नांदेड/वर्धा (प्रतिनिधी)–** ग्रामीण भागातील आर्थिक प्रगतीसाठी सहकार क्षेत्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून, गोदावरी अर्बनचे कार्य अर्थव्यवस्थेला बळ देणारे आहे, असे गौरवोद्गार सहकार, गृहनिर्माण, शालेय राज्यमंत्री तथा पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी केले.

गोदावरी अर्बनच्या वर्धा शाखेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्य-क्रमात ते बोलत होते. यावेळी संस्थापक अध्यक्ष ना. हेमंत पाटील, अध्यक्ष राजश्री पाटील, नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, अप्पर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, वर्धा अर्बनचे अध्यक्ष सुधाकर साठवणे, मा. जि. प. उपाध्यक्ष संजय कामनापुरे, व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर, सचिव ॲड. रविंद्र रगटे, प्रा. सुरेश कटकमवार, अजय देशमुख, रुद्र पाटील, नगरसेवक सचिन होले, उपसरपंच सचिन खोंसे, बाळासाहेब साळवे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

ना. डॉ. पंकज भोयर म्हणाले की, ग्रामीण भाग हा सहकाराचा कणा आहे. शेतकरी, कष्टकरी, लघुउद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक पाठबळ देण्याचे मोठे कार्य गोदावरी अर्बन करीत आहे. संस्थेची भूमिका, उद्दिष्टे आणि भविष्यातील नियोजन दूरदृष्टीचे असून, समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम संस्था प्रभावीपणे करत आहे.तसेच वर्धा परिसरात आणखी शाखा सुरू करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत सेवा पोहोचवावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

अध्यक्षा राजश्री पाटील यांनी सांगितले की, ज्यांची पत नाही त्यांची पत निर्माण करण्यासाठी गोदावरी अर्बनची स्थापना करण्यात आली. संस्थेचे सभासद आर्थिक सक्षम होण्याबरोबर आर्थिक साक्षर व्हावेत, यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील आहे. ग्राहकांचा विश्वास, कर्मचाऱ्यांची निष्ठा आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने संस्था सातत्याने प्रगती करत आहे.

प्रास्ताविकात व्यवस्थापकीय संचालक धनंजय तांबेकर यांनी सांगितले की, गोदावरी अर्बनने देशातील सहा राज्यांत आपले कार्यक्षेत्र विस्तारले आहे. फेसलेस कर्ज वितरणासह आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकांना जलद व सुलभ सेवा देण्यात येत आहे. वर्धा शाखेने सर्वाधिक सोनेतारण कर्ज वितरणाचा मान मिळविला असल्याचे नमूद करून शाखा व्यवस्थापक चंद्रशेखर कामडी यांचा गौरव करण्यात आला.

## आयशरची दुचाकीला धडक; एकजण जागीच ठार, एक गंभीर

### दुष्काळी फाट्याजवळील घटना



**हिमायतनगर (प्रतिनिधी)–** हिमायतनगरहून सिरंजनी मार्गे शासनाचे रेशन घेऊन कौठा ज. कडे जाणाऱ्या आयशर टेम्पोची दुचाकीला समोरासमोर जोरदार धडक बसली. या दुर्घटनेत दुचाकीवरील एकाचा जागीच मृत्यू झाला, तर एकजण गंभीर जखमी झाला आहे. जखमीवर ग्रामीण रूग्णालयात उपचार करून अधिक उपचारासाठी नांदेडला हलविण्यात आले आहे. ही घटना शनिवार, दि. २५ रोजी दुपारी साडेबारा वाजताच्या दरम्यान घडली आहे.

अपघातातील आयशर ट्रक एम. एच. २६ एच. ७६७७ हा कौठा ज. गावाकडे सिरंजनी मार्गे जात होता. दरम्यान याच रस्त्यावरून सिरपल्ली येथील दुचाकी क्र. एम. एच. २९ ए.झेड. ४५३८ हिमायतनगरकडे येत होती. दुष्काळी फाट्याजवळ आयशर व दुचाकीची समोरासमोर धडक झाली. या दुर्घटनेत गणेश सदाशिव जाधव वय ५५ वर्षे रा. सिरपल्ली ता. हिमायतनगर यांचा जागीच मृत्यू झाला. तर शंकर विठ्ठल वानखेडे वय ४० रा. सिरपल्ली हे गंभीर जखमी झाले आहेत. दरम्यान जखमीला तातडीने ग्रामीण रूग्णालयात प्राथमिक उपचार करून नांदेडला हलविण्यात आले आहे. घटनास्थळाला हिमायतनगर पोलिसांनी भेट देऊन घटनेचा पंचनामा केला आहे.

रस्त्यालगत शेती असलेल्या शेतकऱ्याने शेतातील कचरा पेटून दिला होता. धुराने दोन्ही वाहन चालकांना अंदाज न आल्याने हा अपघात घडला असल्याचे स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले.

## अवैध खंजर बाळगणाऱ्या एकाला अटक तर गुन्हा करण्याच्या तयारीत असलेले जाळ्यात



**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत स्ट्रीट सेफ्टी पथक प्रमुख तथा शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व त्यांचे सहकारी गस्त घालत असताना माळटेकडी पुलाखाली त्यांना एक संशयित सापडला. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून एक खंजर जप्त करण्यात आला आहे, तर याच परिसरातून दोन संशयित गुन्हेगारांना अटक केली आहे.

नांदेड शहराच्या विमानतळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत शहर वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे व त्यांचे सहकारी मालटेकडी परिसरामध्ये शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास गस्त घालत होते. यावेळी त्यांना अहमदपूर जिल्हा लातूर येथील सुनीलसिंग दर्शनसिंग दुधाने (वय २६) हा संशयास्पदरित्या थांबलेला आढळला. त्याला ताब्यात घेऊन त्याची विचारपूस केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडून एक खंजर जप्त करण्यात आला आहे.

यानंतर हे पथक काही अंतरावर पुढे गेले असता तेथेही गंभीर गुन्हा करण्याच्या तयारीत असलेले परभणी येथील अर्जुनसिंग धारासिंग दुधानी (वय ३१) आणि किरपालसिंग गुरुबचनसिंग दुधानी (वय २६) या दोघांनाही ताब्यात घेतले. या तिघांना विमानतळ पोलीस ठाण्यात आणून पोलीस अंमलदार हनुमंत पाकलवाड यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या चोरट्यांकडून एक दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

## जिल्ह्यात पोलीस अधीक्षकांच्या क्रॅक डाऊननुसार काम करणार -पोनि अतुल भोसले



**नांदेड (प्रतिनिधी) –**शहर व जिल्ह्यात येणाऱ्या काळात गुन्हेगारांच्या टोळ्या तयार होणार नाहीत यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या क्रॅक डाऊन सूत्रानुसार जिल्ह्यातील गुन्हेगारीचे समूळ उच्चाटन करू. या सोबतच सर्वसामान्यांना कायद्याचे रक्षण देत गुन्हेगारांना मात्र सळो की पळो करून सोडल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असा विश्वास स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल भोसले यांनी गोदातीर समाचारशी बोलताना दिला.

स्थानिक गुन्हे शाखेचा कारभार मागील अडीच वर्षापासून तत्कालीन पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांनी यशस्वी सांभाळला होता. त्यांच्या काळात अनेक गुन्हेगारी जगतातील टोळ्यांवर एमपीडीए, हद्दपार यासोबतच मोक्कासारख्या कारवाया करून गुन्हेगारांना जेरबंद केले. आजही अनेक टोळ्यांतील मुख्य सूत्रधार हे राज्यातील वेगवेगळ्या कारागृहात सरकारी पाहुणचार घेत आहेत. परंतु त्यांना आर्थिक गुन्हे शाखेत पाठवून स्थानिक गुन्हे शाखेची खुर्ची माझ्यासारख्या अधिकाऱ्याला पोलीस अधीक्षकांनी देऊन माझ्यावर विश्वास टाकला.

मी नक्कीच नांदेडची वाटचाल गुन्हेगारी मुक्तीकडे नेण्याचा प्रयत्न करीन. आता खऱ्या अर्थाने मला गुन्हेगारांविरुद्ध काम करण्याची संधी मिळाली. यासोबतच अवैध धंदे चालकांनाही रान मोकळे होऊ देणार नाही. मागील कामाचा अनुभव माझ्या पाठीमागे असून दोन व दोनपेक्षा अधिक गुन्हेगार एकत्र येऊन करण्यात येणारे गुन्हे मोडीत काढण्यासाठी कठोर पावले उचलणार असल्याचे त्यांनी सांगितले. गुन्हा घडल्यानंतर त्या गुन्ह्याच्या मुळापर्यंत जाऊन आरोपींना अटक करू आणि त्यांना त्यांची जागा दाखविल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही, असेही ते म्हणाले.

जिल्ह्यात गुटखा, मटका, अवैध दारू, वाळू, या धंद्यावर नियंत्रण मिळविण्याचा प्रयत्न करत किशोरवयीन मुले गुन्हेगारीकडे वळणार नाहीत याची खबरदारी घेण्यासाठी त्यांचे मन परिवर्तन होईल यासाठी मी व माझे सर्व अधिकारी, कर्मचारी प्रयत्न करणार. एखादा गुन्हा घडल्यानंतर गुन्हेगाराच्या कुटुंबासह त्याच्या अन्य मित्र मंडळींचीही झाडाझडती घेऊन त्यांचा जर एखाद्या गुन्ह्यात अदृश्य सहभाग असेल तर वेळप्रसंगी त्यांच्यावरही गुन्हा दाखल करू, असेही भोसले यांनी सांगितले.

### नांदासौख्यभरे

**मोरे-देशमुख**

सौ. सुषमा संतोषराव देशमुख रा. लिंबाळा (दाऊ) ता. औसा, जि. लातूर यांची सुकन्या चि. सौ. कां. नम्रता यांचा शुभविवाह सौ. पल्लवी श्रीनिवासराव मोरे देशमुख रा. सोनखेड ता. लोहा, जि. नांदेड यांचे ज्येष्ठ सुपुत्र चि. मधुराज यांचेसमवेत रविवार, दि. २६ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६.३५ वाजता संत गाडगेबाबा क. म. वि. सोनखेड येथे संपन्न होत आहे.

वधू-वरांस हार्दिक शुभेच्छा.

**-मुख्यसंपादक**

## शिक्षण सेवक कृती समितीच्यावतीने काढण्यात आला कॅण्डल मार्च



**नांदेड (प्रतिनिधी)–** शिक्षण सेवक म्हणून रूजू असताना अकाली निधन झालेल्या राज्यातील शिक्षण सेवकांना श्रध्दांजली वाहण्यासाठी, शिक्षण सेवकांच्या न्याय हक्कांसाठी व मागण्यांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी शुक्रवार, दि. २४ एप्रिल रोजी सायंकाळी नांदेडमध्ये शिक्षण सेवक कृती समितीच्यावतीने महात्मा फुले चौकात कॅण्डल मार्च काढण्यात आला. तत्पूर्वी समाजसुधारक महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांच्या पुतळ्याला सर्व शिक्षकांनी अभिवादन केले.

नियमित शिक्षकांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या शिक्षण सेवकांना सेवा कालावधीत कोणतीही सुरक्षा मिळत नाही. शिक्षण सेवकांचा मृत्यू झाल्यास त्यांचे कुटुंब उघड्यावर पडते व मयतांच्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळतो. शिक्षण सेवक कालावधीत शिक्षकांना अल्प मानधनावर सेवा करावी लागते. मयतांच्या वारसांना नोकरी देत आर्थिक लाभ द्यावे. शिक्षण सेवकांना सर्व प्रकारचे सेवा संरक्षण लागू करावे अशा शिक्षण सेवकांच्या मागण्या तसेच शिक्षण सेवक कालावधी रद्द करण्याची मागणी शिक्षक संघटनांनी आजपर्यंत केली आहे.

न्यायालयात दाखल असलेल्या याचिकेबद्दल सरकार आपली भूमिका स्पष्ट मांडत नसून, वेळकाढूपणा करत असल्याचे दिसत आहे. शिक्षण सेवकांच्या प्रश्नांबाबत शासनाचे सातत्याने दुर्लक्ष होत आहे. त्यामुळे शासनाने शिक्षण सेवकांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून न्याय द्यावा, अशी मागणी कॅण्डल मार्चनंतर झालेल्या आद्धांजली सभेत करण्यात आली.

यावेळी प्रा. डॉ. विनोद चव्हाण यांनी शिक्षण सेवकांच्या प्रलंबित मागण्यांकडे सरकार दुर्लक्ष करीत असल्याचे सांगितले. शिक्षण सेवकाचे निधन झाल्यास शासनाकडून कुटुंबियांना कोणतेही संरक्षण मिळत नाही. आपल्या मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी सर्व शिक्षण सेवकांनी एकत्र यावे व शिक्षण सेवक कालावधी रद्द करण्यासाठी व्यापक लढा उभारावा, असे सांगितले.

या कॅण्डल मार्चमध्ये प्रा डॉ. विनोद चव्हाण, प्रा. आकाश करंडे, प्रा. लक्ष्मण कोकाटे, प्रा. डॉ. गजानन ढोणे, प्रा. हनुमंत इंगळे, प्रा. तिरुपती पाटील, प्रा. प्रदीप जाधव, प्रा. अक्षय वडजे, प्रा. जयंत जोशी, प्रा. आदिनाथ पायघन, प्रा. आदित्य गोडबोले, प्रा. शिवलिंग चोंडे, प्रा. किरण बिचकुंदे, प्रा. बापू खुरंगे, प्रा. अंकिता वडजे, प्रा. प्रतीक्षा सुर्वे, प्रा नेहा बोरकर, प्रा. राहुल टिचुकले, प्रा. कैलास पाटील, प्रा. गजानन चौधरी, मधुकर शेवाळे, लक्ष्मीकांत पोगुलवाड, दिनेश चाटसे, महेश श्रीरामे, राहुल पवाडे, गिड्डेअण्णा धोत्रे यांच्यासह विविध शाळा, महाविद्यालयातील नवनियुक्त शिक्षक सहभागी झाले होते.

## फुले-शाहू-आंबेडकर विचारांचा जागर; नांदेडमध्ये जाहीर व्याख्यानाचे आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहीद पोचिराम कांबळे स्वयंसहायता बचत गटाच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त रविवार दि. २६ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता नरहर कुरुंदकर सभागृह, पीपल्स कॉलेज येथे जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

फुले, शाहू, आंबेडकर यांचे विचार आणि आजचे समाज वास्तव या विषयावर व्याख्यान होणार आहे. सामाजिक परिवर्तनवादी विचारांचा जागर घडविण्याचा प्रयत्न या माध्यमातून केला जाणार आहे.

स्वातंत्र्याच्या ७५ वर्षानंतरही एससी, एसटी, ओबीसी समाजातील मोठा घटक हालाखीचे आणि शोषित जीवन जगत असल्याची वस्तुस्थिती आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार या मूलभूत प्रश्नांवर शासन अपयशी ठरत असून वाढती बेरोजगारी, दारिद्र्य आणि सरकारी नोकऱ्यांचे कमी होत जाणारे प्रमाण यामुळे समाजात अस्वस्थता निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत महापुरुषांनी दिलेला संघर्षाचा आणि परिवर्तनाचा मार्गच दिशादर्शक ठरू शकतो, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## महालनबाई शिंदे यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)–** तालुक्यातील शेणी येथील ज्येष्ठ महिला नागरिक महालनबाई मारोतराव शिंदे यांचे शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर रविवारी सकाळी १० वाजता अर्धापूर तालुक्यातील शेनी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

महालनबाई शिंदे यांच्या पश्चात पती, २ मुले, १ मुलगी, सुना, नातू, पणतू, असा परिवार आहे. सेवानिवृत्त शिक्षक मारोतराव शिंदे यांच्या पत्नी तर भाजपाचे पदाधिकारी बाळू पाटील धुमाळ यांच्या सासूबाई होत.

## जागतिक हिवताप दिन नांदेड येथे साजरा




**नांदेड (प्रतिनिधी)–** जागतिक हिवताप दिनानिमित्त शनिवार, दि. २५ एप्रिल रोजी नांदेड येथे जनजागरण रॅली काढून जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात आला.

यावेळी काढण्यात आलेल्या रॅलीस मनपा अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. अमृत चव्हाण, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिठे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. बद्दीओदीन यांनी हिरवी झेंडी दाखविली. ही रॅली महात्मा गांधी पुतळ्यापासून ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापर्यंत काढण्यात आली.

यावेळी सहायक अधीक्षक विजय चव्हाण, आरोग्य पर्यवेक्षक संजय भोसले, गंगाधर गनलेवार, आरोग्य निरीक्षक माधव कोल्हे, सत्यजीत टिप्रेसवार, व्यंकटेश पुलकंठवार, बालाजी निलपत्रेवार, अरुण आळणे, सुरेश आरगूलवार, मनोहर खानसोळे, प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी विलास नाईक, सचिव दळवी, राजू शेट्टे, वैभव कौशल्ये, आरोग्य कर्मचारी पुष्पराज राठोड, गणेश भुसा, प्रभाकर मुंगल, व्यंकटी बकाल, भारत हाम्पले, उत्तम कराड, व्यंकट मोरे, अनिल सूर्यवंशी, यासीन शेख, चंद्रभान धोंडगे, सुनिल बगाटे, विष्णूदास गलपवाड, संजय कळसे, रणखांब, पवार, देविदास पेंढारकर, भीमराव राठोड, शेख खलील, कैलास कुंटुरवार, परमेश्वर स्वामी मठदेवरु, लिपीक पांडुरंग बोरकर, क्षेत्र कर्मचारी यांच्यासह कर्मचारी रॅलीत सहभागी होते. व्यंकटेश पुलकंठवार यांनी डास निर्मूलन प्रतिज्ञा देऊन रॅलीचा समारोप केला.

## शहराच्या शाश्वत विकासासाठी मनपाकडून विद्युत उपकेंद्रास होणार जागा उपलब्ध

### खा. अशोकराव चव्हाण यांच्या पुढाकाराने वीज प्रश्न सुटणार

**नांदेड (प्रतिनिधी)–** शहराचा विस्तार आणि वाढती लोकसंख्या विचारात घेता, भविष्यात अखंडित आणि उच्च दाबाचा वीज पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. शहरामध्ये नवीन विद्युत उपकेंद्र उभारण्यासाठी महानगरपालिका आवश्यक जागा उपलब्ध करून देणार आहे, असे महपौर कविता मुळे यांनी सांगितले.

शहरातील नवीन वसाहती आणि व्यावसायिक क्षेत्रांमुळे विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सध्याच्या यंत्रणेवरील ताण कमी करण्यासाठी नवीन उपकेंद्रांची गरज आहे. महावितरणच्या तांत्रिक निकषांनुसार ३३/११ के. व्ही. उपकेंद्र उभारणीसाठी शहरातील मौजे असदुल्लाबाद सर्वे न. ६० मधील १ एकर जागा चालू बाजारभावाप्रमाणे रोख मावेजा किंवा महापालिकेकडे संबंधित विभागाचे थकीत असलेले विद्युत देयके समायोजन यापैकी उचित कारवाई करून जागा महावितरणला हस्तांतर करण्यासाठी महासभेने दि. १६ मार्च २०२६ रोजी ठरावाद्वारे मंजुरी दिली असून, त्यानुसार प्रस्ताव महापालिकेने महावितरण कंपनीकडे सादर केला आहे.

शहरातील वाढत्या वीज तक्रारी संदर्भात शासन स्तरावर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व माजी मुख्यमंत्री तथा खा. अशोकराव चव्हाण यांच्यात चर्चा झाल्यानुसार काही दिवसांपूर्वी महापालिकेत झालेल्या बैठकीत खा. अशोकराव चव्हाण यांनी महापौर कविता मुळे आणि मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांना शहरातील वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी महावितरणला सहकार्य करण्याचे निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने महापालिकेच्या दि. १६ मार्च २६ रोजी सर्वसाधारण सभेत तातडीने ठराव मंजूर करून तसा प्रस्ताव महावितरणकडे सादर केला आहे. या नवीन उपकेंद्रांमुळे शहरातील वारंवार खंडित होणारा वीज पुरवठा आणि लो-व्होल्टेजची समस्या कायमस्वरूपी मार्गी लागेल. सदरील जागा महावितरणकडे हस्तांतरीत करण्यासाठी प्रभाग क्र.५ मधील नगरसेवक तथा सभागृह नेता ॲड. महेश कनकदंडे, माजी महापौर जयश्री पावडे, साहेबराव गायकवाड, शांभवी साले यांनी विशेष प्रयत्न केले.



माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकराव चव्हाण यांच्या निर्देशानुसार घेतलेल्या महानगरपालिकेच्या या निर्णयामुळे नांदेड उत्तरमधील वीजपुरवठ्याची समस्या दूर होणार असून, पायाभूत सुविधांच्या विकासाला गती मिळणार आहे. नागरिकांना दर्जेदार नागरी सेवा उपलब्ध करून देण्यास प्राधान्य दिले जात असल्याचे यावेळी महापौर कविता मुळे यांनी स्पष्ट केले आहे.

नांदेडमध्ये नागरिक विजेच्या लपंडावामुळे हैराण असताना महानगरपालिकेच्या माध्यमातून अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली यावर तोडगा काढण्यासाठी आम्ही प्रयत्नरत आहोत, त्याच उद्देशाने महानगरपालिकेच्या मालकीची जागा महावितरण कंपनीला हस्तांतरित करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागरिकांच्या सोयीसाठी करण्यात येत असलेल्या या हस्तांतरण प्रक्रियेचा काडीमात्र संबंध नसलेल्यांनी विनाकारण याचे श्रेय घेण्याचा केविलवाणा प्रयत्न करू नये, असे प्रतिपादन महापौर सौ. कविता मुळे यांनी केले आहे.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com